


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६४ वे * अंक ९१ * नांदेड * सोमवार, दि. ७ एप्रिल २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211



# 'जय श्रीराम, जय जय श्रीराम...'च्या जयघोषाने नांदेड शहर दुमदुमले

## लोकप्रतिनिधींसह हजारो रामभक्त शोभायात्रेत सहभागी











**नांदेड (प्रल्हाद कांबळे)**– 'जय श्रीराम, जय जय श्रीराम..'च्या जयघोषाने रामजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दि. ६ एप्रिल रोजी रामनवमीनिमित्त नांदेड शहरात भव्य अशी शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत रामभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तसेच रामनवमीनिमित्त शहरातील राममंदिर, हनुमान मंदिरांमध्ये धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

श्रीराम जन्मोत्सव समितीतर्फे दुपारी सजीव देखाव्यांसह भव्य शोभायात्रेला सुरूवात झाली. उन्हाचा पारा ४१-४२ अंशांवर पोहचलेला असतानाही मिरवणुकीतील अलोट गर्दी आणि रामभक्तांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता.

चैत्र शुद्ध नवमी हा हिंदू पंचांगानुसार चैत्र महिन्यातील नवरात्राचा नववा दिवस. या दिवशी प्रभू रामचंद्रांचा जन्म झाला. त्यामुळे हा दिवस रामनवमी म्हणून साजरा केला जातो. मठ, मंदिरांत भजन, पूजन, किर्तन प्रवचनाबरोबरच रामायण ग्रंथांचे वाचन, रामकथेचे निरुपण, गीत रामायणचे कार्यक्रम गुढीपाडव्यापासूनच सुरु होतात. रामनवमीचे औचित्य साधून शहरातील श्रीराम मंदिर, हनुमान मंदिरांमध्ये गुढीपाडव्यापासूनच अभिषेक, काकड आरती, प्रवचने, हरीकिर्तन, रामकथांचे आयोजन करण्यात आले होते.

रविवारी सकाळी प्रभू श्रीराम यांच्या मूर्तीचा अभिषेक करून, काकड आरतीनंतर दुपारी १२ वाजता राम जन्मोत्सव फुलांच्या पाकळ्या उधळून, सियावर रामचंद्र की जय..च्या नामघोषामध्ये साजरा करण्यात आला. राम जन्मला गं बाई...राम जन्मला या गीताचे सूर शहरातील सर्वच मंदिरांतून ऐकायला मिळाले. त्यानंतर सजविलेल्या पाळण्यामध्ये प्रभू श्रीराम यांच्या पादुका ठेवून महिलांनी ताला-सुरामध्ये पाळणा म्हंटला. बहुतांश मंदिरांमध्ये राममूर्तीला, प्रतिमेला विविध शृंगार करण्यात आला होता.

या शोभायात्रेत राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, खासदार रविंद्र चव्हाण, खासदार अजित गोपछडे, आमदार प्रताप पाटील चिखलीकर, आमदार बालाजीराव कल्याणकर, आमदार आनंदराव पाटील बोंढारकर, माजी आमदार तथा भाजपचे महानगराध्यक्ष अमरनाथ राजुरकर, जिल्हाध्यक्ष संतुक हंबर्डे, भाजपचे दत्ता पाटील कोकाटे, मिलिंद देशमुख, दिलीपसिंघ सोढी यांच्यासह श्रीराम जन्मोत्सव समितीचे पदाधिकारी आदींची उपस्थिती होती.

### अलोट गर्दीत मिरवणूक

श्रीराम जन्मोत्सव समितीच्यावतीने रविवारी दुपारी एक वाजता रेणुकामाता मंदिर गाडीपुरा येथून मिरवणुकीला सुरुवात झाली. यामध्ये श्रीराम, सीता, लक्ष्मणाचा सजीव देखावा, वानरसेनांसह चार चाकी वाहनावर साकारण्यात आला होता. मध्यभागी प्रभू श्रीराम यांची भव्य प्रतिमा सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. या मिरवणुकीत छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्री गुरु गोविंदसिंघजी, महाराणा प्रताप, संत रविदास महाराज, अण्णाभाऊ साठे, संत बसवेश्वर महाराज, वाल्मिक रुषी, अग्रसेन महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, अहिल्यादेवी होळकर, वासवी कन्याका माता आदींच्या प्रतिमाही लक्षवेधी होत्या. तुर्रे-दार-फेटे परिधान केलेल्या ढोलपथकरांनी प्रात्यक्षिकांतून उपस्थितांचे लक्ष वेधले. गाडीपुरा येथून निघून जुना मोंढा, देना बँक चौक, महावीर चौक, वजिराबाद चौक, शिवाजीनगर, आयटीआय, श्रीनगर, वर्कशापमार्गे जाऊन अशोकनगर हनुमान मंदिराजवळ मिरवणुकीचा समारोप झाला.

### सजीव देखाव्यांनी लक्ष वेधले

रामनवमिनिमित्त गेल्या एक आठवड्यापासून शहर भगवे करण्यात आले. मुख्य चौकात, रस्त्यावर श्रीरामाचे कटआऊट व भगव्या पताका लावण्यात आल्या होत्या. रविवारी दिवसभर गगणभेदी घोषणांनी शहर दुमदुमले. रखरखत्या उन्हातही राम भक्तांचा उत्साह ओसंडून वाहत होता. गाडीपुरा भागातील श्री रेणुकादेवी मंदिरासमोरून दुपारी मिरवणुकीला सुरुवात झाली. श्री प्रभू रामचंद्रांची भव्य प्रतिमा एका वाहनावर ठेवण्यात आली होती. तसेच चंद्रशेखर आझाद, शहीद भगतसिंह, राजगुरु, वानर सेना अशा सजीव देखाव्यांनी मिरवणुकीत जोष वाढवला. लेक, वाचवा, लेक शिकवा, जल है तो कल है, स्वच्छतागृहांचा वापर करा, स्वच्छता, आरोग्य शिक्षण असे विविध सामाजिक संदेश देणारे देखावेही शहरवासियांचे लक्ष वेधून घेत होते. लेझीमपथक व ढोल पथकाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. मिरवणुक रस्त्यावर विविध संघटनांनी प्रसाद व थंड पेयाची व्यवस्था केली होती. हातात भगवा ध्वज, डोक्याला पट्टी व मुखात राम नामाच्या घोषणा यामुळे सर्वत्र भक्तीमय वातावरण पहावयास मिळत होते. कसरतीचे खेळ, भजनीमंडळी, वारकऱ्यांची दिंडी आणि घोड्यावर स्वार झालेले छत्रपती शिवाजी महाराज, तसेच राणी लक्ष्मीबाई, अहिल्यादेवी होळकर, राजमाता जिजाऊ यांच्या सजीव देखाव्यामुळे वातावरण अधिकच जल्लोषपूर्ण झाले होते.

### शोभायात्रा दरम्यान पोलिसांचा तगडा बंदोबस्त


रामनवमीनिमित्त काढण्यात आलेल्या शोभा यात्रेमुळे शहराची शांतता बाधित होणार नाही, याची काळजी आठ दिवसांपासून पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी घेतली होती. रविवारी सकाळी स्वतः पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्याला भेट देऊन शोभायात्रा मार्गाची पाहणी केली. शिवाजीनगर भागात आयटीआयपासून पोलीस अधीक्षक यांनी शंभर सीसीटीव्ही कॅमेरे लावले होते. यासोबतच ड्रोनचाही वापर करण्यात आला. या सर्व कॅमेऱ्यांचे कंट्रोल शिवाजीनगर ठाण्यातून केले जात होते. तसेच शोभायात्रा शिवाजीनगरमध्ये पोहोचताच देशभक्तीपर गीते वाजविण्यात आली. शोभायात्रा रात्री दहा वाजता शांततेत अशोकनगर येथे पोहोचली. ब्राह्मण महासंघाचे निखिल लातूरकर यांच्या वतीने बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांना पुरीभाजी वाटप करण्यात आली. यावेळी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलिस अधीक्षक सुरज गुरव, डॉ. खंडेराव धरणे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक, स्थानिक गुन्हे शाखेचे उदय खंडेराय, पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, परमेश्वर कदम, सदाशिव भडीकर, जालिंदर तांदळे, रामदास शेंडगे, गणेश चव्हाण, रणजीत भोईटे, नामदेव रिठ्ठे, बबन कर्हाळे, शिवाजी गुरमे यांच्यासह मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता.













जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका होणार की नाही?

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मागील चार वर्षांपासून रखडल्या आहेत. राज्यातील २९ महानगरपालिका, २५७ नगरपालिका, २६ जिल्हा परिषद, २८१ पंचायत समित्या आणि २७,००० हून अधिक ग्रामपंचायतींचा कारभार सध्या प्रशासकांच्या हाती आहे. मागील काही महिन्यांपासून निवडणुका घेण्यासंदर्भात हालचाली सुरू झाल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने सरकारला स्पष्ट निर्देश दिले आहेत की, ओबीसी आरक्षणासंबंधी आवश्यक डेटा संकलित करावा आणि निवडणुका वेळेत पार पाडाव्यात. मात्र, अद्याप निवडणुकांचे नेमके वेळापत्रक जाहीर झालेले नाही. ही परिस्थिती लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांना बाधा आणणारी ठरत आहे. कार्यकर्ते आणि नागरिक यांच्या दृष्टिकोनातून या निवडणुका लवकरात लवकर पार पडाव्यात, अशी अपेक्षा आहे. मात्र, प्रशासकांच्या माध्यमातून राज्याचा कारभार चालवण्याने सत्ताधारी गट काही प्रमाणात समाधानी असल्याचे चित्र दिसत आहे. या निवडणुकांच्या रखडण्यामागे अनेक कारणे आहेत. प्रारंभी प्रभाग रचनेतील अडचणी होत्या, त्यानंतर ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरून निवडणुका लांबल्या. महाराष्ट्रात १९९४ पासून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसींसाठी २७% राजकीय आरक्षण होते. मात्र, २०२१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने हे आरक्षण रद्द केले. यामागे सरकारने सादर केलेला अपुरा 'एम्पिरिकल डेटा' हा प्रमुख मुद्दा ठरला. न्यायालयाने स्पष्ट केले की, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांचे आरक्षण घटनात्मक असले तरी ओबीसींसाठीच्या आरक्षणासंबंधी राज्य सरकारला अधिक प्रमाणित डेटा सादर करावा लागेल. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मागासलेपणाचा अभ्यास करणारा स्वतंत्र आयोग स्थापन करणे आवश्यक होते. तसेच एकूण आरक्षण ५०% पेक्षा जास्त होणार नाही, याची काळजी घेण्याचे निर्देश दिले होते. मात्र राज्य सरकारने या अटी पूर्ण करण्यास विलंब केला. परिणामी, ओबीसींसाठीचे राजकीय आरक्षण स्थगितच राहिले आणि निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या. या मुद्यावरून राज्यात राजकीय वातावरण तापले आहे. विरोधक सरकारवर आरोप करत आहेत की, त्यांनी केंद्राकडून आवश्यक डेटा मिळविण्यासाठी प्रयत्न केले नाहीत. तर, सत्ताधारी गट केंद्रावर जबाबदारी टाकत आहेत. ओबीसी आरक्षणासंदर्भात केंद्र सरकारने पुरेसा डेटा उपलब्ध करून दिला नसल्याचा मुद्दा उपस्थित केला जातो. वास्तविक पाहता, बिहार-मध्ये जाती आधारित जनगणना पूर्ण झाली आहे, परंतु केंद्र सरकारने अद्याप राष्ट्रीय पातळीवर यासंदर्भात ठोस भूमिका घेतली नाही. परिणामी महाराष्ट्रातील निवडणुका अनिश्चिततेत सापडल्या आहेत. यामुळे लोकशाहीची गळचेपी आणि नागरी हक्काचे उल्लंघन होत आहे. या परिस्थितीत, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकप्रतिनिधींच्या निवडीऐवजी प्रशासकांमार्फत कारभार चालवला जात आहे. स्थानिक प्रश्न, नागरी सुविधांच्या सुधारणा आणि विकास प्रकल्पांबाबत नागरिक थेट निवडून दिलेल्या प्रतिनिधींशी संवाद साधू शकत नाहीत. परिणामी, लोकशाहीच्या मूळ संकल्पनेलाच तडा जात आहे. गेल्या चार वर्षांत प्रशासकांच्या माध्यमातून चालवला जाणारा कारभार हा तात्पुरत्या स्वरूपाचा असतो. त्यामुळे स्थानिक विकासात सातत्य राहत नाही. नागरिकांना आपल्या समस्या मांडण्यासाठी कोणत्याही निवडून दिलेल्या प्रतिनिधींची सोय नाही. त्यामुळे लोकशाही प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांनी आता यावर ठोस भूमिका घेतली पाहिजे. निवडणुका अधिक विलंब न लावता पार पाडण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. लोकशाही व्यवस्थेचा गाडा सुरळीत चालावा यासाठी नागरिकांनीही या विषयावर जागरूक राहून सरकारला उत्तरदायी ठरवणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबवणे हा लोकशाही प्रक्रियेसाठी धोक्याचा इशारा आहे. ओबीसी आरक्षणाचा मुद्दा सुटला तरी निवडणुकीसाठी आणखी विलंब केल्यास लोकशाही व्यवस्थेवर मोठा आघात होईल. त्यामुळे सरकार, निवडणूक आयोग आणि न्यायालयांनी संयुक्तपणे यावर तातडीने तोडगा काढून लोकशाहीला बळ द्यावे. सत्ताधारी आणि विरोधकांनी या मुद्यावर राजकारण न करता, जनतेच्या हिताचा विचार करणे गरजेचे आहे. लोकशाही ही लोकांसाठी आणि लोकांद्वारे चालवली जाणारी व्यवस्था आहे, आणि त्याचा गाडा सुरळीत राहावा, यासाठी निवडणुका लवकरात लवकर घेणे आवश्यक आहे.

# प्रगल्भ विचारांची मानवी संपत्ती

मन जितके शुद्ध आणि निष्पाप असेलं तितके ते नियंत्रित करणे सोपे जाते. असे स्वामी विवेकानंद म्हणतात.त्यासाठी आपल्या जीवनात संपूर्ण नीतीमत्ता असणे गरजेचे आहे,पण अनैतिक कृत्य करणाऱ्या लोकांनी एक आपले स्वतंत्र तत्वज्ञान निर्माण केले असते, 'प्रामाणिक माणूस आयुष्यात कधीच मोठा होऊ शकत नाही.' जसे मोठे होण्यासाठी बेईमानी, विश्वासघात, चोरी, लबाडी हे सर्व मॉडर्न गुण खूप महत्वाचे असतात. हा विचार (?) उर्फ अविचार घेऊन जगणारी माणसे समाजात पर्यायाने आपल्या महान भारतात खूप मोठ्या प्रमाणावर आहेत. या सर्व जेष्ठांच्या वर्तनाचा उगवत्या पिढीच्या मनावर खूप वाईट परिणाम होतो. पुढे युवावस्थेत हेच अनुकरण युवक युवती करतात.मनोनिग्रहासाठी युवकांच्या जीवनात एक आचारसंहिता असणे गरजेचे आहे. नसता त्यांच्या जीवनात द्वेष, मत्सर, घृणा, क्रोध, भीती, लोभ, मोह, वृथा अभिमान ह्या विकृती निर्माण होतात. मनात आसक्ती व द्वेष निर्माण होतो.मनाची शांतीच तरुणाई हरवून बसते. आज युवापिढी नेमकी आपल्या मनाची शांतीच हरवून बसलीआहे.

आहारविहारावर कुठल्याही प्रकारचे नियंत्रण राहिले नाही. शुद्ध सात्विक आहार कशासाठी? वैद्यकशास्त्राने मांसाहाराचे समर्थन केले असल्यास त्याचे प्रमाण किती असावे? अतिथंड प्रदेशात मद्याचे समर्थन केले जाते,त्यामुळे भारतासारख्या उष्णकटिबंधीय देशात बाराही महिने मद्यप्राशन करून आपल्या आरोग्यावर अन्याय करणारे लोक, त्यातही युवापिढी आघाडीवर असल्यामुळे त्याचे शारीरिक, मानसिक, सामाजिक व आर्थिक पातळीवर भोगावे लागणारे दुष्परिणाम. पराकोटीची व्यसनाधिनता त्याचे आपल्या वर्तनावर व चारित्र्यावर होणारे दुष्परिणाम, ह्या सर्व बाबीवर विचार केल्यावर जैविक घड्याळाप्रमाणे आपली दिनचर्या असावी आणि मानवी जीवनातील उज्वल भविष्यकाळासाठी त्या जैविक घड्याळाचे महत्व काय, यावर विचार करायला या युवा पिढीला वेळ कसा मिळावा? या सर्व गुंतागुंतीमुळे मार्गदर्शक किंवा समुपदेशकाचे काम अधिक कठीण होत चालले आहे. एक काळ असा होता की, सामान्य ज्ञान मिळविण्यासाठी गुरु मिळत नाही. त्यामुळे अस्वस्थ झालेला शिष्य परिवार दिसत होता. आज स्थिती दुसऱ्या टोकाला गेली आहे. माहिती आणि ज्ञानाचा आंतरजालाने तर स्फोट घडवून आणला आहे. त्यामुळे शिक्षकाचे स्थान गौण झाले आहे. ज्ञान व माहितीचा प्रत्यक्ष जीवनात कसा उपयोग करुन घ्यायचा? शिक्षणातून शील व चारित्र्य कसे घडवावे? त्याचा उपयोग राष्ट्र उभारणीसाठी कसा करावा? हे सर्व सांगण्यास प्रत्यक्ष आणि आंतरजालावर शिक्षक उपलब्ध आहेत. नाही कसं म्हणता? पण प्रत्यक्ष मन व विचार पटलावर ते सर्व बिंबवून त्याचे उपयोजन करण्यास हा युवा किती सक्षम झाला आहे? हे पहाण्याची गरज कोणालाच वाटत नाही, कारण सर्व यश अपयश परिक्षा पध्दतीशी निगडीत झाले आहे.प्रत्यक्ष रोजगार मिळविण्यासाठी प्रमाणपत्र, ओळख, पैसा याला महत्त्व प्राप्त झाले आहे.इथे गुणवत्ता,कार्यक्षमता आणि फलप्राप्ती याचे अत्यंत प्रामाणिक व निपक्षपातीपणाने मूल्यमापन केंव्हा होणार? आम्ही प्रगल्भ विचारांच्या आणि कार्य-क्षमतेच्या मानवी संपत्तीची अपेक्षा या व्यवस्थेच्या बळावर किती व कशी करणार?

ह्या सर्व नकारात्मक बाबीचा विचार करुनही आपल्या भवितव्याविषयी अत्यंत जागरुक असणाऱ्या युवकांना मार्ग सापडतो. निराश किंवा हताश न होता एक मार्ग बंद झाल्यावर दुसऱ्या मार्गाच्या शोधातच राहून माझे नेमके काय चुकले आहे?आता त्यात सुधारणा करुन मला काय करावे लागणार आहे? त्यात माझे नशीब,दैव,प्रारब्ध ह्या गोष्टी मधे आणल्या की वैफल्य हमखास येणार. युवकांनी ठरवले तर तो किती दुर्दम्य आशावादी असू शकतो याचे जिवंत उदा.सुनीता विल्यम आणि बुच विल्मर हे अद्भूताचे प्रवासी. आपल्या मनाची तयारी असल्यास काय घडू शकते. या घटनेचा विचार केल्यावर एक गोष्ट आपल्या लक्षात येते. युद्धात विजय मिळविणाऱ्या युवकापेक्षा आपल्या मनावर ताबा मिळविणारा किंवा मनोनिग्रह करणारा युवक किती महत्वाचा. मनोनिग्रहामुळे आपण अनेक यशाची शिखरे सर करु शकतो. असामान्य आणि अद्भुत शक्तीचा क्रमबद्ध अभ्यास करुन त्या अनुषंगाने साधना करणे आणि यशोशिखर गाठणे शक्य आहे.अनेक अलौकिक शक्ती मानवी मनात असतात.त्या युवावस्थेत अधिक कार्यरत होतात.आपले मानवी मन विश्वमनाचाच एक अंश आहे.एका मनाचा दुसऱ्या मनाशी जोडलेला सहसंबंध असल्याने प्रत्येक मन विश्वाच्या कोणत्याही ठिकाणी असले तरी त्याचा बंध सर्व विश्वाशी जोडलेला असतो. अर्थात वैश्विक विचार मान्य असणारेच हे सत्य मान्य करतील.जे एका कुटुंबात राहुन म्हणत असतील माझ्या भावाशी माझा काय सबंध,माझ्या मुलांशी माझा काय संबध,माझ्या पत्नी-शी......? अशा वरकरणी सुधारीत पण त्याचे मन व विचार अतिमागास असेल तर त्याला हा वैश्विक विचार कसा कळावा? महासागराच्या अनंत लाटा जशा त्याच महासागराच्या अंश असतात.त्याचप्रमाणे आपल्या सर्वांची मने त्याच विश्वमनाचा अंश आहेत.या अखंडत्वामुळे एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी आपण पोहचतो.आपल्या विचारांची देव-णघेवाण होते.हा स्वामी विवेकानंदानी व्यक्त केलेला वैश्विक विचार जर मानवी देहातील सर्व प्राण्यांना कळाला असता तर खरंच जग किती सुंदर झाले असते?या विश्वातील अनेक महान विभूतीचे आपण अवलोकन केले तर एक बाब प्रकर्षाने आपल्या लक्षात येते. त्यांची ग्रंथनिर्मिती,त्यांचे विचार यापेक्षाही त्यांचा जीवनपट खूप मोलाचा वाटतो.त्यामुळे त्यांचे विचार त्यांच्या अनुभव विश्वातून आ-लेले असतात. ते त्यांच विश्व खूप व्यापक आणि प्रखर वास्तव असतं.त्यामुळे येणारे विचार व ग्रंथ निर्मिती आणि प्रत्येक कृति तेवढीच दमदार असते.सर्व काही तावून सुल-ाखून येतं.त्यामुळं ते सर्व युगानुयुगे टिकणारं असतं.चिरकाल,चिरंतन या अतिसुंदर शब्दाची निर्मिती त्यामुळेच झाली असावी.केवळ हे शब्द किती आनंद देणारे असतात.बुद्धीच्या प्रभावापेक्षा व्यक्तीमत्वाचा प्रभाव कितीतरी जास्त असतो.आपले कार्य आपल्या व्यक्तीमत्वाची बाह्य अभिव्यक्ती असते.व्यक्तीमत्वाचे प्रगटीकरण आपल्या कार्यातून होते.आपल्या कर्तृत्वाचा आनंद आपल्या चेहऱ्यावर प्रगट होतो. कारणाचा अंतर्भाव कार्यात झाला तर कारणेच शिल्लक राहणार नाहीत.अनेक युवक कारणांची जंत्री तयार करुन कार्य करण्याचे टाळतात आणि जेंव्हा कर्तृत्व सिद्ध करणे गरजेचे असते,तेंव्हा मन,मेंदू,मस्तिष्क आणि शरीरही साथ देत नाही.उंच भरारी घेण्यासाठी पंखात बळ असते,तेंव्हा आपल्या विचारांना दिशा दिली नसेल आणि जेंव्हा कर्तृत्व सिद्ध करण्याची वेळ येते,तेंव्हा दशदिशा फिरुनही दशा संपत नाही.त्यावेळी व्यवस्थेला दोष देऊन मोकळे व्हायचे. आपल्या उणिवा झाकण्यासाठी असे प्रयोग होतांना आपण नेहमीच पहातो. व्यवस्था सदैव आपल्या सोयीची असू शकणार नाही.व्यवस्थेवर् मात करणारा सुनियोजित संघर्ष करण्याची आमची तयारी असावी.समस्येच्या मुळाशी जाऊन विचार आम्हाला करता आला पाहिजे.

सृष्टीतील दृष्य (मूर्त) जगाकडे पाहून सामान्य माणसे काम करतातच,पण अदृष्य (अमूर्त) सूक्ष्म,सूक्ष्मादीसूक्ष्म,अव्यक्त या बाबीचा विचार करून जेंव्हा आपल्या कार्याची सुरुवात होते.ती आपली दृष्टी,वृत्ती व प्रवृत्ती होते. तेंव्हा या विश्वातील अनेक गूढ सत्याचा उलगडा होतो.कोणताही नवा विचार,नवे संशोधन स्विकारण्या पूर्वी त्यासाठी अपार मेहनत घेणारा युगप्रवर्तक हा इतरांच्या दृष्टीने वेडा असतो. त्याच्या प्रत्यक्ष कार्याचा लाभ समस्त मानव जातीला होतो.तेंव्हा जग त्याला डोक्यावर घेते. आपल्या मनावर व विचारावर नियंत्रण नसणारी माणसे अल्पशा कारणाने अतिसंवेदनशील होतात.त्यात आपण किती प्राणहानी व वित्तहानी करतो याचे भान त्यांना राहत नसेल तर त्यांना देशाची मानवी संपत्ती कसे म्हणावे? मनावर नियंत्रण नसणाऱ्या युवापिढीत विकृती वाढीस लागलेली आहे.मनशांती हरवून बसलेला युवक सर्व अनुकूलता असूनही त्याचा योग्य लाभ घेवू शकणार नाही.त्यांच्यातील कार्यशक्ती प्रकट झाली तरी तिथे नकारात्मक कार्याचे प्रगटीकरण होईल. विकार,भावक्षोभ व तणाव ज्यांच्या मनात थैमान घालतात. ते युवक अनेक मानसिक आजारांचे बळी ठरतात. सहजपणे विघातक कार्य करण्यासाठी तयार होतात.त्याचे दुष्परिणाम कौटुंबिक, सामाजिक व राष्ट्रीय जीवनात दिसून येतात. त्यामुळेच आपल्या मनावर नियंत्रण असणारी विचारी पिढी ही प्रत्येक देशाची राष्ट्रीय संपत्ती समजली जाते. ती संख्येने किती आहे.याला काही अर्थ नसतो.त्या मानवी संपत्तीचा दर्जा खूप महत्वाचा असतो.उंच भरारी घेवू शकणारी सक्षम युवाशक्ती देशाची मानवी संपत्ती आहे.हे आपल्या देशातील केंद्र व राज्य शासनालाही कळावे.शिक्षणक्षेत्राकडे अनुत्पादक क्षेत्र म्हणून पहाण्याचा शासनाचा दृष्टीकोन बदलावा. ते खा-जगी क्षेत्राकडे सोपवून त्याचे बाजारीकरण करुन भावी पिढीकडून खूप भरीव कार्याची अपेक्षा करणे हे किती योग्य,हे समजून घेण्याची सद्बुद्धी राज्यकर्त्यांना होवो.प्रगल्भ विचाराची कार्यक्षम युवाशक्ती शिक्षणा मधूनच निर्माण होणार.हे सूर्यप्रकाशा एवढे सत्य नाकारुन शिक्षण क्षेत्राला अनुत्पादक क्षेत्र समजणाऱ्या लोकप्रतिनिधींना जगातील कोणता सर्वश्रेष्ठ पुरस्कार द्यावा? यासाठी एक वैश्विक पातळीवर तज्ञाची समिती नेमुन त्यांना पृथ्वीवर विचार करणे शक्य नसल्यास अंतराळात जाऊन संशोधन करण्याची संधी आंतरराष्ट्रीय पातळीवर झाली पाहिजे.

**–प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

# शास्त्रज्ञ डॉ. शंकर आबाजी भिसे 'भारतरत्न'च्या तोडीचे

स्वातंत्र्यपूर्व काळातील थोर भारतीय संशोधक डॉ. शंकर आबाजी भिसे यांची आज पुण्यतिथी. त्यांचा जन्म २९ एप्रिल १८६७ रोजी मुंबईत झाला. डॉ. शंकर आबाजी भिसे यांची आज पुण्यतिथी असल्याने त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे तरीही त्यांचा विसर पडणाऱ्यांचीच संख्या यंदाही अधिक असेल. ज्या काळात भारतीय नागरिकांना कमी लेखले जात होते. त्याकाळात डॉ. भिसे यांनी संशोधन क्षेत्रात अजोड कार्य केले.



लहानपणी एकदा भिसे साखर आणायला वाण्याकडे गेले. त्यावेळी वाण्यानी लबाडी करून कमी वजनाची साखर दिल्याचं त्यांच्या लक्षात आलं. याबाबत त्यांनी व्यापाऱ्याला विचारलं असता माझ्या काट्यावर विश्वास नसेल तर आपोआप वजन करणारं यंत्र शोधून काढ. असं वाण्याने त्यांना खोचकपणे म्हटलं. त्यावेळी एक दिवस तुला असे यंत्र देईन अस छोटा शंकर त्यांना आत्मविश्वासाने म्हणाला. लहानपणा-पासून संशोधनाची आवड असणाऱ्या डॉ. भिसे यांनी वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी दगडी कोळशापासून गॅस शुद्ध करण्याचे यंत्र बनवले.

१८९७ मध्ये इन्व्हेंटर रिव्हीव अँड सायंटिफिक रेकॉर्ड या मासिकाने स्वयं-मापन यंत्र करण्याची एक स्पर्धा जाहीर केली. स्वयंमापन यंत्र म्हणजे साखर, पीठ इत्यादी वस्तूंचे गिऱ्हाईकाला हवं तेवढं वजन करून देणारं यंत्र. डॉ. भिसे यांनी अशा यंत्राचा आराखडा तयार करून पाठवला. त्यांनी तयार केलेल्या वजन मापन यंत्राच्या आराखड्याला इंग्लंडमध्ये पहिले बक्षीस मिळाले. या स्पर्धेत युरोप आणि अमेरिकेतल्या नामांकित यंत्र शास्त्रज्ञांनी भाग घेतला होता हे विशेष. इंग्लंडमध्ये गेल्यावर त्यांनी छपाईच्या क्षेत्रात अनेक शोध लावले. १९०० साली डॉ. भिसे यांचं लक्ष मुद्रण व्यवसायातील यंत्र सामग्रीकडे लागलं. त्या काळी प्रचलित असलेल्या लायनो, मोनो इत्यादी यंत्रांची रचना आणि कालमर्यादा यांचा अभ्यास करुन त्यांनी भिसो टाईप या यंत्राचा शोध लावला व त्याचं प्रथम इंग्लंडमध्ये आणि नंतर अमेरिक, जर्मनी, फ्रांस या देशांमध्ये पेटंट घेतले. या यंत्राच्या उत्पादनासाठी सर रतनजी टाटा यांचे सहकार्य मिळवून द टाटा भिसे इन्व्हेशन ही कंपनी १९१० मध्ये लंडन येथे स्थापन केली. पण १९१५ मध्ये ती बंद पडली. त्याच सुमारास दर मिनिटाला साधारण बाराशे अक्षर छावणारं गुणीत मातृका हे यंत्र तयार केलं आणि १९१६ मध्ये विक्रीला आणलं.

१९१६ साली भिसे अमेरिकेला गेले तिथे त्यांनी युनिव्हर्सल टाईप क्लस्टर हे यंत्र शोधून काढले आणि अमेरिकेत त्याचं पेटंट घेतले. याशिवाय मुद्रण व्यवसायातली आणखी अनेक यंत्रे त्यांनी तयार केली. डॉ. भिसे यांनी शोध लावलेल्या ऑटोमेडियन या गुणकारी औषधामुळे पहिल्या महायुद्धात अनेक सैनिकांचे प्राण वाचले. डॉ. भिसे यांच्या साठाव्या वाढदिवशी इंग्लंडमध्ये त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला. या सुमारास त्यांची महान शास्त्रज्ञ थॉमस अल्वा एडिसन यांच्याशी भेट झाली. एडिसन यांनीही त्यांच्या संशोधन कार्याचा गौरव केला. डॉ. भिसे इंग्लंड-मध्ये असताना इंग्लंडचे आफ्रिकेशी युद्ध सुरू झाले. स्वयंचलित तोफा काढण्याची विनंती तेथील कारखानदारांनी डॉ. भिसे यांना केली. त्यासाठी डॉ. भिसे यांना त्यांनी खूप पैसे देऊ केले, पण आपले संशोधन हे विश्वाच्या कल्याणासाठी असून आपल्या संशोधनातून विश्वाचा संहार होऊ नये अशी त्यांची मानवता-वादी भूमिका होती. म्हणूनच त्यांनी ही मागणी नम्रतापूर्वक नाकारली. डॉ. भिसे यांनी सुमारे २०० शोध लावले. त्यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे ७ एप्रिल १९३५ रोजी या महान शास्त्रज्ञाचे निधन झाले. संशोधन क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य अतुलनीय आहे. शासनाने त्यांच्या या महान कार्याची दखल घेऊन मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करावा.

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# निसर्गाच्या सानिध्यात राहिल्यास मन प्रसन्न राहाते!



आपण जन्माला आलो ते केवळ स्वता:ची मौज मजा करण्यासाठी नसुन समाजाची सेवा केली पाहीजे. भले निसर्गाच्या सानिध्यात राहून वा-वरत असताना त्याची करण्यात येणारी देखभाल म्हणजेच परमेश्वराची सेवा करणे असे असले तरी आपल्याकडून निसर्गाची अवहेलना होणार नाही याची काळजी प्रत्येक व्यक्तीने घेतली पाहीजे. अशी काळजी मुक्काम पोस्ट बेसर्डे, तालुका - भुदरगड, जिल्हा कोल्हापूर येथे निसर्ग वेडे श्री. प्रकाश वेळु यांनी स्वमेहनतीने उभा केलेला 'काजु फार्म हाऊस' होय. 'दगडासारख्या कठीण परिस्थितीवर घाव घालण्याची जिद्द असली की मूर्ती सारखी सुंदरता आयुष्यात लाभते.' हे प्रकाश वेळु व त्यांच्या सुविध्द पत्नी सौ. प्रिया वेळु यांनी आपल्या कर्तृत्वातून, जिद्दीतून आणि अफाट प्रर्यत्नातून दाखवुन दिले आहे. दोघेही उच्च शिक्षित असले तरी प्रथम ते शेतकरी आ-हेत हे विसरलेले नाहीत. मुळात शेतीची आवड असणाऱ्या या जोडप्याने अशक्य ते शक्य करुन दाखविले आहे. त्यासाठी त्यांना काका सुरेश वेळु व रमाकांत वेळु यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. मुळात हे दोघे, काका व त्यांच्या मुलांच्या सहकार्यामुळेच आम्ही काजु फार्म हाऊस उभे करु शकलो. असेही सौ. प्रिया वेळु यांनी सांगितले.

बेसर्डे येथील काजु फार्म हाऊस म्हणजे त्यांचे स्वप्न साकार झाल्यासारखे वाटते. त्यासाठी वेळ देऊन स्वता कष्ट घेऊन उभे केलेल हे काजु फार्म हाऊस. खरच ही एक स्वप्न नगरीच आहे असा भास होतो. पर्यटकांच्या मनाचा विचार करुन सर्व सुखसोयींनी परिपूर्ण असे हे फार्म हाऊस कोल्हापूर वरुन ७० कि.मी., पुण्यावरुन २५० कि.मी., कणकवली किवा गोव्यावरुन ९० कि. मी. वर आहे. येथे पर्यटकांच्या आवडी निवडीचा विचार करुन राहण्यासाठी व फिरण्यासाठी चार एकर चा परिसर मोकळा ठेवलेला आहे. हे फार्म हाऊस डोंगराच्या उतारावर असल्यामुळे सकाळी सुर्योदय व संध्याकाळी सुर्यास्त फारच मनोरंजक दिसतो. शिवाय भरपूर वनराई व सुंदर निसर्गरम्य परिसर असल्यामुळे पर्यटकांच्या आनंदात विशेष भर पडते. म्हणून निसर्गाच्या सानिध्यात राहिल्यास मन नेहमीच प्रसन्न राहाते.

मुलांसाठी हिरवळ व गार्डन, रेनवॉटर, आयुर्वेदीक झाडांची लागवड, ट्रेकर ग्रुपसाठी ट्रेकिंगची व्यवस्था, विविध फुलझाडे, आंबाबाग, पोफळीची लागवड, विविध मसाल्याची झाडे अशा प्रकारे पर्यटकांना आवडणाऱ्या सर्व गोष्टींचा विचार करुन हे काजु फार्म निर्माण करण्यात आलेले आहे. काजु लागवड जास्त प्रमाणात असल्यामुळे त्याला काजु फार्म असे नाव देण्यात आले आहे. ज्येष्ठ नागरिकांना त्रास होऊ नये म्हणून राहण्याची व्यवस्था तळमजल्यावर केली आहे. जेवण तर येथे फारच स्वादिष्ठ आणि घरगुती पध्दतीचे मिळते. सकाळी चहा नाष्टा आपल्या आवडी प्रमाणे दिला जातो. मनाचा गाभारा जर तृप्त असेल तर बुध्दीच्या अंतरंगातून उमटणारा प्रत्येक विचार दुसऱ्यांच्या भल्यासाठीची प्रार्थना असते. असे नेहमीच सौ. प्रिया वेळु व राहूल राबाडे यांच्या टीमला वाटते.

एकदा आलेला पर्यटक हा पुन्हा यायलाच पाहिजे याच महत्वाकांक्षेने हे फार्म हाऊस बनविण्यात आलेले आहे. 'आनंद, प्रेम, आपुलकी, जिव्हाळा, वात्सल्य, लळा व अपार मेहनत हे सर्व जेव्हढे समाजात पेराल त्याच्या दुप्पटीने तुमच्याकडे परत येतील. कारण हाच निसर्गाचा नियम आहे.' आणि हेच सौ. प्रियाने हेरुन, त्याचा अभ्यास करुन निसर्गवेड्या पर्यटकांना आवडेल असे हे काजु फार्म हाऊस बनविले आहे. कारण पर्यटकांचे समाधान हाच आमचा नफा आहे. असे राहूल राबाडे व प्रिया वेळु या टीमचे मनोगत आहे. जर मानवाने निसर्ग जपला तरच मानवाला निसर्ग जपेल हा सृष्टीचा व निसर्गाचा नियम आहे. काजु फार्म हाऊसवर येण्यासाठी किंवा आधिक माहीती साठी श्री. राहूल राबाडे - कोल्हापूर ९३२५६५७४७४, सुरेश वेळु वेसर्डे ९४२०९३११९५ यांच्याशी संपर्क साधावा.

**–दत्ताराम दळवी**
लालबाग,
मो. ९८२०५२७८५५

# मिशन लक्ष्यवेध अंतर्गत खासगी अकादमीच्या सक्षमीकरणासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन


**मुंबई :** अद्ययावत क्रीडा प्रशिक्षण यंत्रणा, पायाभूत सुविधा, क्रीडा वैद्यकशास्त्र, क्रीडा स्पर्धांचे आयोजन, खेळाडूंना पुरस्कार व प्रोत्साहन, खेळाडूंकरीता करीअर मार्गदर्शन व खेळाडूंच्या क्षमतांचा विकास करण्याच्या उद्देशा-ने मिशन लक्ष्यवेध या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. मिशन लक्ष्यवेध अंतर्गत खा-जगी अकादमींना आर्थिक सहाय्य करण्यात येणार असून, इच्छुक क्रीडा अकादमींनी २१ एप्रिल पर्यंत अर्ज करावेत अशी माहिती मुंबई उपनगरच्या जिल्हा क्रीडा अधिकारी रश्मी आंबेडकर यांनी दिली आहे.

राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार प्रसार व जोप-ासना करण्यासाठी व प्रतिभावंत खेळाडू तयार करण्यासाठी शासन सतत प्रयत्नशील आहे. खेळाडूंनी ऑलिम्पिकसारख्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदके संपादित करण्याकरिता नियोजनबद्ध प्रयत्न करण्यात येत आहेत. मिशन लक्ष्यवेध अंतर्गत निवडण्यात आलेल्या ॲथलेटिक्स, आर्चरी, बॅडमिंटन, बॉक्सिग, हॉकी, लॉन टेनिस, रोईंग, शुटींग, सेलींग, टेबल टेनिस, वेटलिफ्टिंग, कुस्ती या १२ क्रीडा प्रकारांच्या राज्यातील उत्तम खेळाडू निर्माण करणाऱ्या खा-जगी अकादमींना आर्थिक सहाय्य देऊन अशा संस्थांचे सक्षमीकरण करण्यात येणार आहे. तरी मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी वॉक्सिंग, अथलेटीक्स, कुस्ती, टेबल टेनिस, व शूटिंग हे खेळ आहेत.

मिशन लक्ष्यवेध अंतर्गत खा-जगी अकादमींना आर्थिक सहाय्य करावयाच्या दृष्टीने संबंधित अकादमी मधील खेळाडू, क्रीडामार्गदर्शक, सहाय्यक प्रशिक्षक, प्रशिक्षणासाठी उपलब्ध पायाभूत सुविधा व त्यांचा स्तर, क्रीडा साहित्य व क्रीडा अकादमीच्या कामगिरींचे गुणांकन करण्यात येऊन, ३५ ते ५० गुण प्राप्त करणाऱ्या संस्था 'क' वर्ग, ५१ ते ७५ गुण प्राप्त करणाऱ्या संस्था 'ब' वर्ग तसेच ७६ ते १०० गुण प्राप्त करणाऱ्या संस्था 'अ' वर्ग अशा प्रकारे वर्गीकरण करण्यात येणार आहे. 'क' वर्ग अकादमींना वार्षिक रु.१०.०० लक्ष, 'ब' वर्ग रु.२०.०० लक्ष व 'अ' वर्ग रु.३०.०० लक्ष आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. यामध्ये पायाभूत क्रीडा सुविधा उभारणी, क्रीडा सुविधा उन्नत करणे, प्रशिक्षक मानधन, क्रीडा व प्रशिक्षण उपकरणे इ बाबींवर खर्च करण्यासाठी शासनामार्फत देण्यात येणार आहे. त्यानुसार इच्छुक संस्थांनी अधिक माहिती व अर्जाचे नमुन्यासाठी मुंबई उपनगर जिल्ह्यातील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी शासकीय शारीरिक शिक्षण महाविद्यालय परिसर, संभाजी नगर समोर, आकुर्ली रोड, कांदिवली पूर्व, मुंबई-४००१०१ या पत्त्यावर संपर्क साधावा व या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती रश्मी आंबेडकर यांनी केलेले आहे.

# प्रगतीमंत्र

## महाराष्ट्र सीईटी प्रवेशपत्र २०२५ कसे डाउनलोड करावे?



**महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून MHT CET 2025 प्रवेशपत्र लवकरच जारी केले जाणार आहे. परीक्षेला बसलेले विद्यार्थी cetcell.mahacet.org या अधिकृत वेबसाइटवरून PCM आणि PCB गटासाठी त्यांचे प्रवेशपत्र आणि हॉल तिकीट डाउनलोड करू शकतात. पीसीबी गटाची परीक्षा ९ एप्रिल ते १७ एप्रिल दरम्यान होईल आणि या काळात १० आणि १४ एप्रिल रोजी कोणतीही परीक्षा होणार नाही. त्याच वेळी, पीसीएम गट परीक्षा १९ एप्रिल ते २७ एप्रिल दरम्यान होणार आहे. यामध्ये २४ एप्रिल रोजी परीक्षा घेतली जाणार नाही.**

एमएएच-एमएचटी सीईटी २०२५ परीक्षा महाराष्ट्रातील विविध केंद्रांवर आणि राज्याबाहेरील काही ठिकाणी ऑनलाइन म्हणजेच संगणक आधारित (सीबीटी) पद्धतीने घेतली जाईल. MHT CET २०२५ मध्ये बहुपर्यायी प्रश्न (MCQ) असतील. प्रत्येक विषयासाठी १०० गुण असतील. म्हणजेच, तुम्हाला प्रत्येक विषयात १०० पैकी गुण मिळतील. महाराष्ट्र सीईटी परीक्षेचा पहिला टप्पा सकाळी ९ ते दुपारी १२ आणि दुसरा टप्पा दुपारी २ ते ५ वाजेपर्यंत असेल. ही परीक्षा पीसीएम आणि पीसीबी दोन्ही गटांसाठी असेल. परीक्षेत अकरावीच्या अभ्यासक्रमाला सुमारे २०% आणि बारावीच्या अभ्यासक्रमाला ८०% महत्त्व दिले जाईल.

### महाराष्ट्र सीईटी प्रवेशपत्र डाउनलोड असे करा

- सर्वप्रथम महाराष्ट्र सीईटी सेलच्या अधिकृत वेबसाइट mahacet.org वर जा.
- वेबसाइटवर MHT CET 2025 प्रवेशपत्र ची लिंक शोधा. तुम्हाला ही लिंक होमपेजवरच मिळेल.
- पीसीएम किंवा पीसीबी ग्रुप विभागात जा आणि लिंकवर क्लिक करा.
- तुमचा अर्ज क्रमांक आणि पासवर्ड एंटर करा. हे तेच नंबर आणि पासवर्ड आहेत जे तुम्ही नोंदणीसाठी वापरले असते.
- एकदा तुम्ही लॉगिन तपशील प्रविष्ट केल्यानंतर, तुमचे MHT CET 2025 हॉल तिकीट स्क्रीनवर दिसेल.
- महाराष्ट्र सीईटी प्रवेशपत्रावर तुमचे नाव, परीक्षेची तारीख, वेळ आणि ठिकाण यासारखे सर्व तपशील काळजीपूर्वक तपासा आणि काही चूक झाल्यास ताबडतोब अधिकाऱ्यांशी संपर्क साधा. जर सर्व काही बरोबर असेल तर प्रवेशपत्र पीडीएफ स्वरूपात डाउनलोड करा आणि प्रिंटआउट घ्या.

## नीट परीक्षा १७ ऑगस्ट रोजी होणार का? विद्यार्थ्यांसाठी इशारा

NEET परीक्षांबाबत अनेक अधिसूचना अधिकृतपणे जारी केल्या जातात, ज्यामध्ये परीक्षेशी संबंधित सर्व माहिती असते. त्यात अर्जाच्या तारखा, परीक्षेच्या तारखा आणि शेवटी निकालाच्या तारखा देखील अधिकृतपणे जाहीर केल्या जातात. अनेक वेळा विद्यार्थी त्यांच्या मित्रांच्या माहितीसाठी सोशल मीडियावर नोटिस शेअर करतात, परंतु ते शेअर करण्यापूर्वी अधिकृत वेबसाइटवर त्याची पुष्टी करणे खूप महत्वाचे आहे.

अलिकडेच एक प्रकरण समोर आले आहे जिथे सोशल मीडियावर एक बनावट सूचना व्हायरल होत आहे ज्यामध्ये NEET PG परीक्षेच्या तारखांबाबत दावे केले जात आहेत आणि असे म्हटले जात आहे की NEET PG ची नियोजित तारीख बदलण्यात आली आहे आणि आता ही परीक्षा १५ जून ऐवजी १७ ऑगस्ट २०२५ रोजी घेतली जाईल, तर ही माहिती पूर्णपणे चुकीची आहे. नीट पीजीची अशी कोणतीही अधिकृत सूचना जारी केलेली नाही. सरकारी वृत्तसंस्था पीआयबीने यावर स्पष्टीकरण दिले आहे आणि सरकारने विद्यार्थ्यांसाठी इशारा देखील जारी केला आहे. भारत सरकारच्या प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरो (PIB) ने NEET PG ची तारीख १७ ऑगस्ट असल्याच्या बातम्या खोट्या असल्याचे म्हटले आहे. पीआयबी फॅक्ट चेकने एक्स वर पोस्ट केले की नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन इन मेडिकल सायन्सेस (एनबीईएमएस) ने अशी कोणतीही माहिती दिलेली नाही. एनबीईएमएस स्वतः ही परीक्षा घेते. पीआयबीने विद्यार्थ्यांना फक्त योग्य माहितीसाठी एनबीईएमएस वेबसाइट natboard.edu.in ला भेट देण्यास सांगितले आहे. NBEMS नुसार, NEET PG 2025 ची परीक्षा फक्त 15 जून 2025 रोजी घेतली जाईल. ही परीक्षा संगणकावर घेतली जाईल. याला संगणक आधारित चाचणी (CBT) म्हणतात. ही परीक्षा दोन शिफ्टमध्ये घेतली जाईल.

## फ्लोरिडा विद्यापीठात शिक्षण घ्यायचं?

### ट्यूशन फी, राहण्याचा अन् जेवणाचा खर्च किती?

**अमेरिकेचे फ्लोरिडा राज्य त्याच्या सुंदर समुद्रकिनारे, मगरी आणि स्पॅनिश संस्कृतीसाठी ओळखले जाते. फ्लोरिडा हे अमेरिकेच्या आग्नेय भागात वसलेले एक राज्य आहे, जिथे जगभरातील लोक राहतात. येथे देशातील सर्वोत्तम संस्थांपैकी एक, फ्लोरिडा विद्यापीठ आहे, जे त्याच्या शैक्षणिक मानकांसाठी आणि मजबूत संशोधनासाठी ओळखले जाते. पदवीपूर्व ते पदव्युत्तर अभ्यासक्रमांपर्यंत येथे शिक्षण दिले जाते. फ्लोरिडा विद्यापीठात जगभरातून विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येतात.**




अमेरिकेत शिक्षण घेणे खूप महाग आहे आणि तेच फ्लोरिडा विद्यापीठाला लागू होते. इथे शिक्षण घेण्यासाठीही तुम्हाला भरपूर पैसे लागतील. अशा परिस्थितीत जर तुम्हाला फ्लोरिडा विद्यापीठात शिक्षण घ्यायचे असेल तर तुम्हाला कोणत्या गोष्टींवर किती पैसे खर्च करावे लागतील हे समजून घ्यावे लागेल. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात फ्लोरिडा विद्यापीठात शिक्षण घेण्यासाठी तुम्हाला किती पैसे खर्च करावे लागतील ते जाणून घेऊया...

अमेरिकेत अशी अनेक विद्यापीठे आहेत जिथे स्थानिक विद्यार्थ्यांकडून कमी शुल्क आकारले जाते तर परदेशी विद्यार्थी आणि इतर राज्यांमधून शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना जास्त शुल्क भरावे लागते. हाच नियम फ्लोरिडा विद्यापीठाला लागू आहे. उदाहरणार्थ, परदेशी विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ शुल्क खूप जास्त आहे तर इतर खर्च स्थानिक विद्यार्थ्यांप्रमाणेच राहतात. जर तुम्हाला येथे पदवीपूर्व शिक्षण घ्यायचे असेल तर तुम्हाला एका वर्षात एकूण $४६,४५८ (सुमारे ४० लाख रुपये) खर्च करावे लागतील.

शिक्षण शुल्काची किंमत $२८,६५८ आहे; पुस्तके, साहित्य आणि उपकरणांची किंमत $१,२३५ आहे; वाहतुकीचा खर्च $१,६६०; राहण्याचा खर्च $१२,६१५; वैयक्तिक खर्चामध्ये $२,२३४ आणि फेडरल विद्यार्थी कर्ज शुल्क $५६ समाविष्ट आहे.

### शिष्यवृत्तीचे पर्याय काय आहेत?

- जर तुम्हाला शिष्यवृत्ती मिळाली तर फ्लोरिडा विद्यापीठात शिक्षणाचा खर्च आणखी कमी होऊ शकतो. येथे, शिष्यवृत्तींसोबत, तुम्हाला फेडरल स्टुडंट लोन आणि वर्क स्टडी प्रोग्रामचा पर्याय देखील मिळतो, ज्यामुळे अभ्यासाचा खर्च लक्षणीयरीत्या कमी होतो.
- फेडरल स्टुडंट लोन : विद्यापीठातील विद्यार्थी फेडरल लोनसाठी अर्ज करू शकतात. पदवीपूर्व विद्यार्थ्यांसाठी कर्ज शुल्क कमी आहे.
- अनुदान आणि शिष्यवृत्ती : फ्लोरिडा आणि इतर राज्यांमधील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण खर्च कमी करण्यासाठी विद्यापीठ गुणवत्तेवर आणि गरजांवर आधारित शिष्यवृत्ती देते.
- वर्क-स्टडी प्रोग्राम : फेडरल वर्क-स्टडी प्रोग्राम विद्यार्थ्यांना अर्धवेळ नोकरी करण्याची संधी देतो. यातून ते त्यांचे शैक्षणिक खर्च भागवू शकतात.

## अमेरिकेत बिजनेस मॅनेजमेंटचे शिक्षण घ्यायचे?

### पदवी मिळविण्यासाठी मुख्य ५ विद्यापीठांबद्दल जाणून घ्या...

**जगभरात बिजनेस अँड मॅनेजमेंट कोर्स वेगाने लोकप्रिय होत आहेत. प्रत्येक उद्योगाला या क्षेत्रात कुशल लोकांची आवश्यकता असते. या वेगाने बदलणाऱ्या अर्थव्यवस्थेत, व्यावसायिकांची मागणी आणखी वाढत आहे. बिजनेस मॅनेजमेंटचा अभ्यास करण्यासाठी अमेरिका हे जगातील सर्वोत्तम ठिकाण मानले जाते. शतकानुशतके येथे व्यवस्थापनाशी संबंधित अभ्यासक्रम शिकवले जात आहेत. अमेरिकन संस्थांमधून पदव्या मिळवून लोकांनी व्यवसाय क्षेत्रात नाव कमावले आहे.**

अमेरिकेत शिक्षण घेण्याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे येथे अनेक उत्तम महाविद्यालये आणि विद्यापीठे आहेत, जे भविष्यातील इंडस्ट्री लीडर तयार करत आहेत. अमेरिकन महाविद्यालये त्यांच्या नवोन्मेष, नेतृत्व आणि रणनीतीसाठी ओळखली जातात. अलिकडेच प्रसिद्ध झालेल्या क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगमध्येही अमेरिकन संस्थांचे वर्चस्व दिसून आले. जगातील टॉप-१५ बिजनेस अँड मॅनेजमेंट संस्थांच्या यादीत पाच अमेरिकन विद्यापीठे आहेत.



### अमेरिकेतील शीर्ष ५ विद्यापीठे

- हार्वर्ड विद्यापीठ : क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये, हार्वर्ड विद्यापीठाला अमेरिकेत तसेच जगात प्रथम स्थान मिळाले आहे. हार्वर्ड विद्यापीठ हे बिजनेस अँड मॅनेजमेंटचा अभ्यास करण्यासाठी जगातील पहिल्या क्रमांकाची संस्था आहे. येथे एंप्लॉयर रेपुटेशन स्कोअर १०० आहे, याचा अर्थ पदवीधरांना सहजपणे नोकऱ्या मिळतात.
- एमआयटी : मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एमआयटी) ही बिजनेस अँड मॅनेजमेंटच्या अभ्यासासाठी देखील एक सर्वोच्च संस्था आहे. क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये एमआयटी अमेरिका आणि जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. येथे विद्यार्थ्यांची विचार करण्याची क्षमता वाढवली जाते आणि नवीन कल्पनांवर भर दिला जातो. त्यांचा एंप्लॉयर रेपुटेशन स्कोअर ९५.८ आहे.
- स्टॅनफोर्ड विद्यापीठ : क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये स्टॅनफोर्ड विद्यापीठ अमेरिकेत आणि जगभरात तिसऱ्या क्रमांकावर आहे. ते बिजनेस अँड मॅनेजमेंट अभ्यासात त्यांची उत्कृष्टता दर्शवते. स्टॅनफोर्ड विद्यापीठाचा एंप्लॉयर रेपुटेशन स्कोअर ९४.६ आहे. याचा अर्थ असा की त्यांच्या पदवीधरांना नोकरीच्या बाजारात मोठी मागणी आहे.
- पेनसिल्व्हेनिया विद्यापीठ : या अमेरिकन विद्यापीठाचे व्हार्टन स्कूल बिझनेस मॅनेजमेंटसाठी ओळखले जाते. क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये ते अमेरिकेत चौथ्या आणि जगभरात नवव्या क्रमांकावर आहे. एंप्लॉयर रेपुटेशन स्कोअर ७९.८ आहे, जो उद्योगात त्याची ओळख दर्शविते.
- कॅलिफोर्निया विद्यापीठ : या अमेरिकन विद्यापीठाने बिझनेस मॅनेजमेंटसाठी शिक्षणात चांगले नाव कमावले आहे. त्याचे गुण अनेक बाबतीत चांगले आहेत. एंप्लॉयर रेपुटेशन स्कोअर ८६.४ आहे, जो उद्योगाला त्यांच्या पदवीधरांवर किती विश्वास आहे हे दर्शविते. जगभरात ते ११ व्या आणि अमेरिकेत पाचव्या क्रमांकावर आहे.




## दहावी, बारावीत नापास झालेली मुलगी झाली आयएएस!

**अनेकदा असे म्हटले जाते की यूपीएससी (युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशन) नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण होणे खूप कठीण आहे. अभ्यासात नेहमीच चांगले राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा सोपी आहे. साधारणपणे, यशस्वी विद्यार्थ्यांच्या कहाण्या अशा असतात की ते नेहमीच अभ्यासात चांगले होते आणि नेहमीच टॉपर होते. पण आज आम्ही तुम्हाला जी कहाणी सांगणार आहोत ती यापेक्षा थोडी वेगळी आहे.**

काही सामान्य विद्यार्थी असे आहेत जे त्यांच्या सुरुवातीच्या अभ्यासात नापास झाले परंतु नंतर त्यांच्या चुकांमधून शिकले आणि मोठे यश मिळवले. आयएएस डॉ. अंजू शर्मा हे असेच एक उदाहरण आहे. त्या एकदा दहावी आणि बारावीच्या परीक्षेत नापास झाल्या होत्या. पण त्यांच्या कठोर परिश्रम आणि समर्पणाने पहिल्याच प्रयत्नात UPSC CSE उत्तीर्ण झाल्या. आयएएस अंजू शर्मा यांचा जन्म राजस्थानमधील भरतपूर येथे झाला. त्यांना सुरुवातीच्या अभ्यासात अनेक अडचणींचा सामना करावा लागला. त्या दहावीच्या प्री-बोर्ड परीक्षेत नापास झाल्या होत्या. नंतर, बारावीत तो अर्थशास्त्र विषयातही नापास झाल्या. या अपयशांमुळे अंजू निराश झाल्या नाहीत. त्यांनी त्यांच्या कमकुवत बाजूंवर प्रकर्षाने काम केले. अखेर त्यांच्या कष्टाचे चीज झाले. त्यांनी विज्ञान विषयात बीएससी पदवी प्राप्त केली आणि सुवर्णपदक जिंकले. यानंतर, त्याने एमबीए (मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन) देखील केले आणि यूपीएससी परीक्षेची तयारी सुरू केली.

### पहिल्याच प्रयत्नात UPSC उत्तीर्ण

१९९१ मध्ये, वयाच्या २२ व्या वर्षी, अंजू शर्मा यांनी पहिल्याच प्रयत्नात UPSC CSE उत्तीर्ण केले आणि IAS अधिकारी बनल्या. त्यांनी हे सिद्ध केले की सुरुवातीचे अपयश एखाद्या व्यक्तीच्या क्षमतेचे प्रतिबिंबित करत नाहीत. आयएएस अंजू शर्मा गुजरात केडरमधील आहेत. त्यांची पहिली नियुक्ती १९९१ मध्ये राजकोटमध्ये सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून झाली. नंतर, त्या जिल्हाधिकारी झाल्या आणि गांधीनगरसारख्या राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये त्यांनी महत्त्वाची पदे भूषवली. क्षमतेमुळे अंजू शर्मा पुढे जात राहिल्या. त्यांना विशेष सचिव, सचिव, प्रधान सचिव आणि सध्या अतिरिक्त मुख्य सचिव या पदांवर बढती देण्यात आली.



## मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यापेक्षा जास्त संपत्ती असलेला अधिकारी

**एक वैज्ञानिक ज्यांनी नंतर सिव्हिल सर्व्हिस ऑफिसर होण्याचा निर्णय घेतला आणि शेवटी त्यांचा हेतू पूर्ण केला आणि आयपीएस झाले. आतापर्यंत तो पाटण्याच्या एसएसपी पदापर्यंत पोहोचले आहेत. नाव आहे- अवकाश कुमार. ते केवळ एक अधिकारी म्हणूनच नाही तर त्यांच्या संपत्तीबद्दलही चर्चेत आहेत. काही अधिकृत आकडेवारी आणि अहवालांनुसार, एसएसपी अवकाश कुमार यांची मालमत्ता बिहारचे डीजीपी आणि राज्याच्या मुख्यमंत्र्यांपेक्षा जास्त आहे.**



३१ मार्च रोजी बिहारच्या अनेक अधिकाऱ्यांनी त्यांची मालमत्ता जाहीर केली. यानुसार, पाटण्याचे एसएसपी आकाश कुमार यांची एकूण जंगम मालमत्ता १.९२ कोटी रुपये आहे जी मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यापेक्षा जास्त आहे. जर आपण ३ महिन्यांपूर्वी नितीश कुमार आणि त्यांच्या मंत्र्यांनी जाहीर केलेल्या मालमत्तेच्या आकडेवारीची तुलना केली तर मुख्यमंत्र्यांकडे फक्त १ कोटी ६९ लाख रुपयांची जंगम मालमत्ता आहे, जी पाटण्याचे एसएसपी अवकाश कुमार यांच्यापेक्षा कमी आहे.

### अवकाश कुमार कोण आहेत?

मूळचे भोजपूरच्या सिमराव गावचे रहिवासी असलेले आकाश कुमार हे पाटण्याचे एसएसपी आणि २०१२ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. त्यांनी त्यांचे बालपण झारखंडमधील बोकारो येथे वडिलांसोबत घालवले. पाटण्याचे एसएसपी होण्यापूर्वी ते सीआयडीमध्ये एसपी म्हणून काम करत होते आणि गया येथे ग्रामीण एसपी, आरा आणि बेगुसराय येथे एसपी आणि दरभंगा येथे एसएसपी म्हणूनही काम केले आहे.

### आयआयटीमधून शिक्षण



गतिमान आयपीएस अधिकाऱ्यांमध्ये गणले जाणारे अवकाश कुमार हे आयआयटी बीएचयूमधून मेकॅनिकल इंजिनिअरिंगमध्ये पदवीधर आहेत. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी संरक्षण संशोधन आणि विकास संघटना म्हणजेच डीआरडीओमध्ये शास्त्रज्ञ म्हणून काम करण्यास सुरुवात केली.

# अयोध्या, काशी, दिल्ली, नागपूरसह देशभरात रामनवमीचा मोठा उत्साह



**नवी दिल्ली :** देशभरात आज रामनवमीचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. अयोध्या, काशी, दिल्ली, नागपूर, कोलकातासह देशातील विविध शहरांमध्ये सकाळपासूनच मंदिरांमध्ये भक्तांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. उत्तर प्रदेशातील अयोध्येत रामनवमीच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या भव्य दिव्य सोहळ्यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे.

संपूर्ण रामनगरी पाने-फुले तसेच रंगीबेरंगी दिव्यांनी सजवण्यात आली आहे. श्रीराम जन्मभूमीचे मुख्य द्वार आणि राम मंदिरालाही आकर्षक सजावट करण्यात आली आहे. कोलकातामध्ये पाच मोठ्या यात्रांसह ५० हून अधिक रामनवमीनिमित्त यात्रा काढण्यात येतील अशी शक्यता आहे. यामुळे पोलिसांनी येथे कडक सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे. युपीच्या ४२ शहरातही रामनवमी बाबत अलर्ट जारी करण्यात आला आहे.

या जिल्ह्यामध्ये अतिरिक्त पोलीस कुमक तैनात करण्यात आली आहे. रामनवमीच्या निमित्ताने पश्चिम बंगाल हे संवेदनशील राज्य आहे. येथे गेल्या काही वर्षांमध्ये विविध शहरांमध्ये रामनवमीच्या निमित्त धार्मिक तणाव पाहायला मिळाला होता. यामुळे येथील सुरक्षा व्यवस्थेबाबत पोलीस अलर्ट आहेत.

शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी मुंबईत १३,५००हून अधिक पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. हिंदू कॅलेंडरनुसार चैत्र महिन्यातील नववा दिवस हा राम नवमी म्हणून साजरा केला जातो. हिंदू ग्रंथ आणि पुराणानुसार या दिवशी श्रीरामांचा जन्म झाला होता. म्हणून याला रामनवमी म्हटले जाते.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही रामनवमीच्या देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. सर्व देशवासियांना रामनवमीच्या खूप शुभेच्छा. प्रभू श्रीरामांचा हा जन्मोत्सव तुमच्या जीवनात नवी चेतना आणि नवा उत्साह घेऊन येवो. तसेच सशक्त, समृद्ध आणि समर्थ भारताच्या संकल्पनेला नवी ऊर्जा प्रदान करो. जय श्रीरामअसे पंतप्रधान मोदींनी आपल्या सोशल मीडियावरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

# उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी मध्य रेल्वेकडून विशेष रेल्वे गाड्या



**मुंबई :** मध्य रेल्वेने उन्हाळी हंगामात प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन आपल्या नियमित गाड्यांव्यतिरिक्त आजपर्यंत ११५६ उन्हाळी विशेष गाड्यांच्या सेवा जाहीर केल्या आहेत, ज्यामध्ये २८४ अनारक्षित गाड्यांचा समावेश आहे.मध्य रेल्वेने यापूर्वी उन्हाळी विशेष गाड्यांच्या १०५८ सेवांची घोषणा केली होती आणि आता प्रवाशांच्या हितासाठी अतिरिक्त ९८ सेवा चालवणार आहे.

रेल्वेने उन्हाळी हंगामात प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मुंबई- मडगाव/कानपूर, पुणे झांसी आणि कलबुरगि -बेंगळुरू दरम्यान ९८ अतिरिक्त साप्ताहिक उन्हाळी विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे, ज्यामध्ये मुंबई सांकराईल दरम्यान ६ अनारक्षित विशेष गाड्यांचा समावेश आहे.

तपशील खालीलप्रमाणे- १.लोकमान्य टिळक टर्मिनस मडगाव लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक विशेष (१० सेवा), ०११०३ साप्ताहिक विशेष गाडी ७ एप्रिल ते ५ मे पर्यंत दर सोमवारी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून सकाळी ८.२० वाजता सुटतील आणि मडगाव येथे त्याच दिवशी रात्री २१.४० वाजता पोहोचतील. (५ सेवा), ०११०४ साप्ताहिक विशेष गाडी ६ एप्रिल ते ४ मे पर्यंत दर रविवारी १६.३० वाजता मडगाव येथून सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी सकाळी ०६.२५ वाजता पोहोचेल. (५ सेवा), थांबे : ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतसंरचना : एक वातानुकूलित द्वितीय, तीन वातानुकूलित तृतीय, दोन वातानुकूलित तृतीय इकॉनॉमी, ८ शयनयान, ४ सामान्य द्वितीय श्रेणी, १ सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड्स ब्रेक व्हॅन आणि १ जनरेटर कार. २. लोकमान्य टिळक टर्मिनस -कानपूर लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक अतिजलद विशेष (२४ सेवा), ०४१५२ साप्ताहिक अतिजलद विशेष गाडी १२ एप्रिल ते २८ जून पर्यंत दर शनिवारी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून १७.१५ वाजता सुटेल आणि कानपूर येथे दुसऱ्या दिवशी १५.४५ वाजता पोहोचेल. (१२ सेवा), ०४१५१ साप्ताहिक अतिजलद विशेष गाडी ११ एप्रिल ते २७ जून पर्यंत दर शुक्रवारी लोकमान्य टिळक टर्मिनस येथून १५.२५ वाजता सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी १४.५५ वाजता पोहोचेल. (१२ सेवा)

थांबे : इगतपुरी, भुसावळ, इटारसी, जबलपुर, कटनी, सतना, प्रयागराज, भरवारी, सिराथू आणि फतेहपूर, संरचना : एक द्वितीय वातानुकूलित, पाच तृतीय वातानुकूलित, ४ शयनयान, ८ सामान्य द्वितीय श्रेणी आणि २ सामान्य द्वितीय श्रेणीसह गार्ड्स ब्रेक व्हॅन. ३. पुणे- झांसी- पुणे साप्ताहिक अतिजलद विशेष (२४ सेवा), ०१९२१ साप्ताहिक अतिजलद विशेष गाडी दि. १०.०४.२०२५ एप्रिल ते २६ जूनपर्यंत दर गुरुवारी १५.१५ वाजता पुणे येथून सुटेल आणि विरांगना लक्ष्मीबाई झाशी येथे दुसऱ्या दिवशी सकाळी १०.०० वाजता पोहोचेल. (१२ सेवा), ०१९२२ साप्ताहिक अतिजलद विशेष गाडी ९ एप्रिल ते २५ जून पर्यंत दर बुधवारी विरांगना लक्ष्मीबाई झाशी येथून १२.५० वाजता सुटेल आणि पुणे येथे दुसऱ्या दिवशी ११.३५ वाजता पोहोचेल. (१२ सेवा).

# महाराष्ट्र राजभवन येथे राजस्थान आणि ओडिशा राज्य स्थापना दिन साजरा

## राजस्थान व ओडिशाचे राज्याच्या विकासात देखील मोठे योगदान -राज्यपाल



**मुंबई :** देशातील लोकांमध्ये एकी नसल्यामुळे विदेशी शासकांनी आपल्यात फुट पडून देशावर अनेक शतके राज्य केले. राज्यांनी परस्परांच्या संस्कृती परंपरांचा आदर केल्यास लोकांमधील एकात्मता वाढेल व सर्वांनी एकदिलाने राष्ट्रासाठी योगदान दिल्यास 'एक भारत श्रेष्ठ भारत' निर्मितीचे स्वप्न साकार होईल असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

राज्यपाल तथा विद्यापीठांचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली राजस्थान आणि ओडिशा या दोन राज्यांचा राज्य स्थापना दिवस महाराष्ट्र राजभवन मुंबई येथे संयुक्तपणे साजरा करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमात सातारा येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी लोकनृत्य व लोकगीतांच्या माध्यमातून राजस्थान व ओडिशा राज्यांच्या संस्कृतीचे सुंदर दर्शन घडविल्याबद्दल राज्यपालांनी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप दिली.

केंद्र शासनाच्या 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमांतर्गत राजभवनातर्फे या राज्य स्थ-ापना दिवसाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाला माजी खासदार रामशेठ ठाकूर, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे प्रोव्होस्ट चंद्रकांत दळवी, कुलगुरु डॉ. ज्ञानदेव म्हस्के, राज्यपालांचे उपसचिव एस राममूर्ती तसेच विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

अवघ्या काही हजार ब्रिटिशांनी देशातील लोकांमध्ये फुट पाडून करोडो लोकसंख्या असलेल्या आपल्या देशावर अनेक दशके राज्य केले. आगामी काळात प्रगतीची शिखरे सर करण्यासाठी देशात एकात्मता टिकून राहणे आवश्यक असून एकतेमुळे देशाचे जगातील स्थान उंचावले असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

राजस्थान व ओडिशा राज्यांचे देशाच्या आणि महाराष्ट्राच्या विकासात देखील महत्वाचे योगदान आहे. ओडिशाचे सुपुत्र शेलेंद्र यांनी इंडोनेशियातील जावा, सुमात्रा येथवर राज्यविस्तार केला होता. ओडिशात जन्मलेल्या नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे स्वातंत्र्यासाठी दिलेले योगदान अनन्यसाधारण होते असे सांगून एक भारत श्रेष्ठ भारत उपक्रमामुळे देशातील लोकांना इतर राज्यातील महान नेत्यांचे योगदान समजण्यास मदत होत आहे, असे राज्यपालांनी सांगितले.

याप्रसंगी दोन्ही राज्यांचा इतिहास, सौंदर्य, वारसा, कला संस्कृती आणि पर्यटन स्थळे दर्शविणारे लघुपट दाखवण्यात आले. यावेळी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी राजस्थानी लोकगीते केसरिया आणि झिरमीर बरसे आणि लोकनृत्य चिरामी, घूमर आणि कालबेलिया सादर केले. राजस्थानी राज्यगीत 'पधारो म्हारो देस'ने उपस्थितांची माने जिंकली.

तसेच, ओडिशातील लोकगीते संबलपुरी गीत- 'रसरकेली बो' आणि लोकनृत्य - संभलपुरी ढलकाई सादर करण्यात आले.

राज्यपालांच्या हस्ते यावेळी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे प्रोव्होस्ट चंद्रकांत दळवी तसेच विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी स्वागतपर भाषण केले तर अवर सचिव (शिक्षण) विकास कुलकर्णी यांनी आभार मानले.

# 'त्या' अपघातग्रस्त कारमध्ये सत्तर लाखांची रोकड! दोघे ताब्यात, नागपूर आयकर विभाग



**बुलढाणा:** एप्रिल महिन्यात खामगाव-शेगाव मार्ग चांगलाच चर्चेत आहे. या मार्गावर २ एप्रिलला झालेल्या भीषण अपघातात सहा प्रवाशांचा मृत्यू झाला होता. राज्य परिवहन महामंडळाची बस, खाजगी बस आणि बोलेरो वाहन एकमेकांवर आदळल्याने ही दुर्घटना घडली होती. घटनेला दोन दिवस उलटत नाही तोच या मार्गावर झालेल्या अपघातात एक इसम गंभीर जखमी झाला.

खामगाव-शेगाव मार्गावरील वरील सिद्धिविनायक अभियांत्रिकी महाविद्यालया कॉलेजसमोर ५ एप्रिल रोजी संध्याकाळी कार आणि दुचाकीचा अपघात झाला. त्यामध्ये दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. संध्याकाळी घटना स्थळ पंचनामा, वाहतूक सुरळीत करणे, रुग्णाला अगोदर खामगाव येथील उप जिल्हा रुग्णालयात व नंतर अकोला येथील शासकीय रुग्णालयात दाखल करणे आदी आवश्यक सोपस्कार पार पडले. नंतर अपघातग्रस्त चारचाकी आणि दुचाकी वाहन शेगाव ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले.

शेगाव तालुक्यातील लासुरा येथील सूरज साहेबराव बोदडे (२५) हे दुचाकी क्रमांक एमएच-३४, एपी-४५११ ने खामगावकडे जात होते. सिद्धिविनायक टेक्निकल कॉलेजच्या जवळ समोरून येणाऱ्या कार क्रमांक एमएच-२१, डीएफ-३४४४ ने त्यांना धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी झाले. त्यांना तत्काळ खामगाव उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना अकोला येथील रुग्णालयात पाठविले.

# पंतप्रधान मोदींनी केले भारतातल्या पहिल्या लिफ्ट स्वरुपाच्या सागरी रेल्वे पुलाचे उद्घाटन

**रामेश्वरम :** पंतप्रधान मोदी श्रीलंका दौऱ्यावरुन भारतात थेट तामीळनाडूत आले आहेत. मोदींच्या हस्ते रामेश्वरम येथे भारतातल्या पहिल्या लिफ्ट स्वरुपाच्या सागरी रेल्वे पुलाचे उद्घाटन झाले. पंबन रेल्वे पूल असे या पुलाचे नाव आहे. रामेश्वरम जवळ पंबन येथे इंग्रजांच्या काळातील एक रेल्वे पूल होता. हा पूल जुना झाल्यामुळे नवा रेल्वेचा पूल बांधण्यात आला आहे. नवा पूल हा जुन्या पुलाच्या तुलनेत आधुनिक आणि अभियांत्रिकीतला एक चमत्कार आहे. या पुलाच्या निमित्ताने भारतात पहिल्यांदाच उभ्या लिफ्ट स्वरुपाच्या सागरी रेल्वे पुलाचे उद्घाटन झाले.

नवा पंबन रेल्वे पूल म्हणजे उभ्या सरळ रेषेत वर खाली होऊ शकेल असा पूल आहे. समुद्रात मोठ्या आकाराची बोट जात असेल त्यावेळी पूल लिफ्ट केला जाईल अर्थात आणखी उंचावर नेला जाईल. यामुळे पूल सुरक्षित राहील आणि विना अडथळा पुलाखालून मोठ्या आकाराचे जहाज पुढे निघून जाईल. नंतर पूल पुन्हा खाली आणून पूर्वस्थितीत ठेवला जाईल. या पुलामुळे तामीळनाडूच्या समुद्र किनारी असलेल्या गावांना रेल्वेद्वारे देशातील प्रमुख शहरांशी जोडणे शक्य होणार आहे.

रेल्वेचा नवा पंबन रेल्वे पूल स्टेनलेस स्टील अर्थात पोलादाचा आहे. हा पूल पुढील किमान १०० वर्षे गंजणार नाही. अतिशय मजबूत आणि मोठ्या सागरी वादळातही टिकून राहील असा हा पूल आहे. हा नवीन २.०८ किलोमीटर लांबीचा पंबन पूल रामेश्वरमला मुख्य भूमीशी जोडतो.

रामाच्या जन्माचा उत्सव रामनवमीच्या दिवशी साजरा करतात. दक्षिण भारतातही हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. रामेश्वरममार्गे प्रभू रामाने लंकेत जाण्यासाठी वानरांच्या मदतीने सागरी सेतू उभारला, असा उल्लेख रामायणात आढळतो. या सर्व संदर्भांमुळे रामेश्वरम जवळच्या पंबन रेल्वे पुलाला वेगळे वलय प्राप्त झाले आहे. या पुलाचे उद्घाटन रामनवमीच्या दिवशी पंतप्रधान मोदींनी केले.

पुलाच्या निमित्ताने विकासाचा मुद्दा पुढे करुन पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टी तामीळनाडूत विधानसभा निवडणूक डोळ्यांपुढे ठेवून प्रचाराला सुरुवात करण्याची शक्यता आहे. तामीळनाडू विधानसभा २३४ सदस्यांची आहे. या विधानसभेची निवडणूक २०२६ मध्ये होणार आहे. पण भाजपाने त्यासाठीची तयारी आधीपासूनच सुरू केली आहे. उत्तर भारतात मजबूत पकड असलेल्या भाजपाने दक्षिणेत चांगली कामगिरी करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

तामीळनाडूत भारतीय जनता पार्टी अण्णाद्रमुकशी युती करुन निवडणूक लढवण्याची तयारी करत आहे. या तयारीचा भाग म्हणून प्रदेशाध्यक्ष के. अण्णामलाई यांना राजीनामा देण्यास सांगण्यात आले आहे.

# २१ वर्षानंतर विद्यापीठात भरला पत्रकारितेच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

**छत्रपती संभाजीनगर-** नांदेड जिल्ह्यात पत्रकारितेच्या शिक्षणाची सुविधा उपलब्ध नव्हती त्यावेळी येथील विद्यार्थी संभाजीनगरसह राज्यात इतरत्र पत्रकारितेचे शिक्षण घेण्यासाठी जात होते. अशाच नांदेडसह राज्यभरातील अनेक पत्रकारितेच्या माजी विद्यार्थ्यांचा वर्ग नुकताच संभाजीनगर येथे भरला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील विविध विभागांपैकी जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभाग हा एक नावलौकिक मिळवलेला विभाग म्हणून पुढे आलेला आहे. या शैक्षणिक वर्षात शिकणारे विद्यार्थी आज अधिकारी, व्यावसायिक, राजकीय व प्रतिष्ठित व्यक्ती म्हणून कार्य करीत आहेत.

ज्या शिक्षक गुरुजनांनी ज्ञानदानाचे कार्य करून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला एक आगळावेगळा आकार देण्याचे काम केले. या सर्वांप्रती ऋण व्यक्त करण्यासाठी व मित्र-मैत्रिणींच्या गाठीभेटी होण्यासाठी शैक्षणिक वर्ष २००१ ते २००४ च्या विद्यार्थ्यांचे नुकतेच गेट-टुगेदर विद्यापीठाच्या स्वर्गवासी विलासराव देशमुख डिजिटल स्टुडिओ या इमारतीमध्ये पार पडले.

या कार्यक्रमप्रसंगी ग्रुपमध्ये सहभागी असलेल्या सर्व महिला भगिनींचा जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पुस्तक व पुष्प देऊन सन्मान करण्यात आला, या कार्यक्रमाला जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागाचे सेवानिवृत्त विभाग प्रमुख डॉ. वि. ल. धारूरकर, प्रा. सुरेश पुरी, डॉ. गणी पटेल यांनी विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले. या कार्य-क्रमाला डॉ. सतीश दवणे, नितीन आघाव, संजय सूर्यवंशी, डॉ. बालाजी शिंदे-पाटील, डॉ. प्रभू गोरे, सिद्धार्थ गोदाम, भाग्यश्री नागदेवे, डॉ. महेंद्र वाडे, सुनील चापुले, ज्योती स्वामी, डॉ. आरती शामल, डॉ. संजीवनी दिपके, दयानंद पाईकराव, नीलिमा साखरे, सुमेध पांडे, श्रीपाद सीमंतकर, डॉ. संतोष धागड, डॉ. विकास राऊत, सहदेव व्होणाळे, जयश्री सोनकवडे, विलास इंगळे, अलका पंडित, कैलास वाहूळ, डॉ. संजय बीरंगणे, राजेंद्र अजमेरा, डॉ. अश्विनी रांजणीकर, रवी गाडेकर, समीर पाठक, संजय देवकाते, प्रतिभा पाठक, गणेश गुप्ता, महेश जोशी, सतीश सोनवणे, विवेक संगे, डॉ. लोपामुद्रा बनसोडे, दादा मुंडे यांची उपस्थिती होती.



गुरुजनांचा पुष्पमाला, पुस्तक व पुष्प-गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थित मित्र-मैत्रिणींनी आपला परिचय दिला. त्यानंतर स्नेहभोजनाचा आस्वाद घेऊन सर्वांनी फोटोसेशनचाही आनंद लुटला. आपण शिकत असताना ज्या बाकावर आपण बसलो होतो त्या बाकाची म्हणजेच बेंचची सर्वांना आठवण झाली आणि मग सर्वांनी आपला मोर्चा विद्यमान ठिकाणी असलेल्या विभागाकडे वळवला. विभागात गेल्यानंतर त्या ठिकाणी विविध स्टुडिओला भेटी दिल्या. बाकावर बसून धारूरकर सर, पुरी सर, पटेल सर यांना अध्यापन करण्याचा आग्रह धरला, त्यांनीही विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत व्हावा म्हणून अध्यापनाचा काही वेळ आनंद घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ज्योती स्वामी यांनी केले तर आभार प्रा. नितीन आघाव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी वृत्तपत्र व जनसंवाद विभागातील प्रा. एस. एस. बिरादार, प्रा. आर. के. वाघ, भिंगारे, कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे नियोजन डॉ. सतीश दवणे व इतर वर्ग मित्रांनी केले होते. सायंकाळी सर्वांनी जड अंतकरणाने घरी जाण्यासाठी एकमेकांचा निरोप घेतला.

# चीनने श्रीलंका पोखरली असतानाच भारताचा श्रीलंकेसोबत उर्जा करार



**नवीदिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि श्रीलंकेच्या राष्ट्रपती अनुरा कुमारा दिसानायके यांच्यात शनिवारी कोलंबो येथील राष्ट्रपती सचिवालयात द्विपक्षीय चर्चा झाली. त्यानंतर, संरक्षण सहकार्य आणि त्रिंकोमालीला ऊर्जा केंद्र म्हणून विकसित करणे यासह अनेक महत्त्वाच्या करारांवर दोन्ही बाजूंनी स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. पंतप्रधान म्हणून मोदींचा हा चौथा दौरा होता. पंतप्रधान मोदींच्या श्रीलंका दौऱ्यातील एक महत्त्वाची कामगिरी म्हणजे त्रिपक्षीय करार. या करारात यूएईचाही समावेश आहे. त्यानुसार, दोन्ही देशांनी देशाच्या उत्तर-पूर्व भागातील त्रिंकोमाली या किनारपट्टी जिल्ह्याला ऊर्जा केंद्र म्हणून विकसित करण्यास सहमती दर्शविली आहे. पारंपारिकपणे तामिळबहुल प्रदेशात या प्रकल्पाची घोषणा करताना मोदी म्हणाले की याचा फायदा सर्व श्रीलंकेला होईल. यामध्ये बहु-उत्पादन पाइपलाइनचा समावेश असेल.

नैसर्गिक बंदर आणि उर्जा सुविधांसह, त्रिंकोमाली भारतासाठी खूप सामरिक महत्त्व आहे कारण तिथल्या मजबूत उपस्थितीमुळे ईशान्य हिंद महासागरात प्रभाव पाडण्यास मदत होईल. श्रीलंकेने चीनी तेल कंपनी सिनोपेककडून ३.७ बिलियनची गुंतवणूक मिळवल्यानंतर ही घोषणा झाली आहे, ही देशातील आतापर्यंतची सर्वात मोठी थेट विदेशी गुंतवणूक आहे.

**भारत आणि श्रीलंका यांच्यातील प्रमुख करार**

ऊर्जा, डिजिटायझेशन, संरक्षण आणि आरोग्य यासह अनेक क्षेत्रांमध्ये ७ सामंजस्य करारांवर स्वाक्षरी. भारतात दरवर्षी ७०० श्रीलंकेसाठी व्यापक क्षमता निर्माण प्रशिक्षण कार्यक्रम जाहीर केला जातो. १०० दशलक्ष कर्जाचे कमी व्याज अनुदानात रूपांतर करण्यास सहमती. 'आंतरराष्ट्रीय वेसाक दिन २०२५' रोजी श्रीलंकेत भगवान बुद्धांच्या अवशेषांचे प्रदर्शन. त्रिंकोमाली येथील तिरुकोनेश्वरम मंदिर, नुवारा एलिया येथील सीता एलिया मंदिर आणि अनुराधापुरा येथील सेक्रेड सिटी कॉम्प्लेक्स प्रकल्पासाठी भारत अनुदान देणार आहे.

श्रीलंकेतील धार्मिक स्थळांवर ५००० सौर रूफटॉप युनिट्स बसवण्यात येणार आहेत. तापमान नियंत्रित गोदाम सुविधा डंबुलामध्ये बांधली जाईल.

या वर्षाच्या सुरुवातीला श्रीलंकेचे अध्यक्ष अनुरा दिसानायके यांच्या बीजिंग भेटीदरम्यान दक्षिण हंबनटोटा प्रदेशात तेल शुद्धीकरणाचा करार झाला होता. भारतासाठी हे महत्त्वाचे आहे की, ज्या चीनने पूर्वी जाफना द्वीपकल्पातील बेटांवर ऊर्जा प्रकल्पांचा शोध लावला आहे, त्याला देशाच्या उत्तर आणि पूर्वेकडील भागात प्रवेश करण्याची परवानगी नाही.

त्रिंकोमाली ऑइल टँक फार्मच्या विकासासाठी भारताने यापूर्वीच श्रीलंकेसोबत करार केला आहे. नवीन सामंजस्य करार अंतर्गत भारत आणखी विकास साधू शकतो. परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी म्हणाले की प्रस्तावित ऊर्जा केंद्र हा श्रीलंकेची ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी, वाजवी दरात ऊर्जा प्रदान करण्यासाठी आणि ऊर्जेच्या निर्यातीद्वारे देशाच्या महसुलात योगदान देण्यासाठी डिझाइन केलेला एक उपक्रम आहे. एक प्रमुख धोरणात्मक आणि ऊर्जा भागीदार म्हणून, णए हा प्रदेशातील अशा प्रकारच्या पहिल्या प्रकल्पासाठी एक आदर्श भागीदार होता.

**'यूएई'च्या भूमिकेची रूपरेषा**

त्यांच्या वाढत्या धोरणात्मक भागीदारीच्या अनुषंगाने, भारत आणि यूएई यांनी २०१८ मध्ये तिसऱ्या देशांमध्ये विकास प्रकल्पांवर संयुक्तपणे काम करण्यास सहमती दर्शवली. यूएईच्या भूमिकेची नेमकी रूपरेषा काय असेल, मिसरी म्हणाले, या सामंजस्य करारांतर्गत इउइ चर्चा सुरू झाल्यावर तपशीलवार माहिती दिली जाईल. अधिकाऱ्याने सांगितले की या फ्रेमवर्क एमओयूद्वारे सक्षम केलेली तात्काळ पुढील पायरी म्हणजे विशिष्ट एजन्सी आणि संस्थांची ओळख आणि नामनिर्देशन आहे जे सरकारी संस्था किंवा खाजगी क्षेत्रातील संस्था किंवा स्वतः सरकारशी संबंधित संस्था असू शकतात जे या कराराचा भाग व्यवसाय ते व्यवसाय साकार करण्याचा प्रयत्न करतील.

# निरोप समारंभाचे भाषण करतेवेळी महाविद्यालयात विद्यार्थिनीचा मृत्यू

**धाराशिव :** परांडा तालुक्यातील शिंदे महाविद्यालयात निरोप समारंभ सुरू होता. या समारंभात बोलतेवेळी २० वर्षांच्या वर्षा खरात हिला हृदयविकाराचा तीव्र झटका आला. बोलता बोलता वर्षा स्टेजवर कोसळली. डॉक्टरांनी तपासून वर्षाचा मृत्यू झाल्याचे सांगितले.

वर्षा निरोप समारंभात भाषण करत होती. ती भाषणाला उभी राहिली तेव्हा तिला कसला त्रास होत आहे, असे कोणालाही वाटले नव्हते. यामुळे बोलता बोलता ती कोसळली तेव्हा उपस्थित असलेले सर्वजण चक्रावले. डॉक्टरांनी वर्षाचा मृत्यू झाल्याचे सांगितल्यावर उपस्थितांना धक्का बसला.

निरोप समारंभाच्या भाषणात वर्षाने शिक्षकांचे आभार मानले. ती महाविद्यालयातील मैत्रिणी आणि शिक्षक यांच्यासंदर्भात बोलत होती. बोलत असताना ती कोसळली.

कुत्रीचे पिल्ले विकणे आहे
डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.
संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# ‘मॉडेल मेकिंग’ स्पर्धेत १५० शिकाऊ डॉक्टरांचा सहभाग

## डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा अभिनव उपक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)–** विष्णुपुरी येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शरीर क्रिया शास्त्र विभागाच्या डॉ. वंदना दुधमल यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या मॉडेल मेकिंग स्पर्धेला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेत १५ गटांच्या माध्यमातून सुमारे १५० एमबीबीएस प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना अवयवांचा त्रिमितीय आकलनात्मक अभ्यास करण्यास मदत झाली.



विद्यार्थ्यांसाठी विष्णुपुरी येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय विविध व अभिनव उपक्रम राबविण्यात अग्रेसर आहे. त्याचाच एक भाग म्हणून अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शरीर क्रिया शास्त्र विभागातील डॉ. वंदना दुधमल यांच्या पुढाकारातून एमबीबीएस प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी मॉडेल मेकिंग स्पर्धा घेण्यात आली. दि. २८ व २९ मार्च रोजी अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेत १५ गटांच्या माध्यमातून १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेत विद्यार्थ्यांना अवयवांचा त्रिमितीय आकलनात्मक अभ्यास करण्याची संधी मिळाली.

प्रथम क्रमांक गट क्रमांक १ (विलियम इंथवॉन) रिफ्लेक्स आर्क यांनी मिळविला. द्वितीय क्रमांक गट क्रमांक ९ (बोरॉन गट) HP O axis यांना मिळाला. तर तृतीय क्रमांक गट क्रमांक २ (परकींजे) Descending Tracts आणि गट क्रमांक ८ (गानोग ग्रुप) Molecular Basis of Muscle Contraction यांना विभागून देण्यात आला. पोस्टर गटातून गट क्रमांक ११ (बर्न अँड लेव्ही) Cardiac Cycle विजेता ठरला.

ग्रामीण पॉलिटेक्नीकचे उपप्राचार्य डॉ. संजय देऊळगावकर, स्वा.रा.ती.म विद्यापीठातील माध्यमशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. राजेंद्र गोणारकर, सुक्ष्म जीवशास्त्र विभागप्रमूख डॉ. संजय मोरे, स्त्रीरोग तज्ज्ञ अनिल साखरे, शरीर रचना विभागप्रमूख डॉ. वैशाली इनामदार यांनी स्पर्धेचे परीक्षण करून निकाल जाहीर केला. अध्यक्षीय भाषणात डॉ. सुधीर देशमुख यांनी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. अशा प्रकारची स्पर्धा वैद्यकीय महाविद्यालयात प्रथमच पाहत असल्याचे नमूद केले. डॉ. संजय देऊळगावकर, डॉ. राजेंद्र गोणारकर, डॉ. संजय मोरे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. शेवटी सर्व विजेत्यांना पारितोषिके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

डॉ. वंदना दुधमल यांनी प्रास्ताविक केले. तर डॉ. मुकुंद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन करून शेवटी आभार मानले. याप्रसंगी डॉ. हेमंत गोडबोले, डॉ. हुमेरा खान, डॉ. पंकज कदम, डॉ. जे. बी. देशमुख, डॉ. राहुल परसोडे, डॉ. मारुती आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. सीमा टाकरस, डॉ. नौशिन, डॉ. भागवत कंधारे, डॉ. अनुब्रता मुखर्जी, डॉ. अक्षय कुमार, डॉ. अनिरुद्ध मुनेश्वर, डॉ. मोहम्मद अली, प्रयोगशाळा तंत्रज्ञ व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# दंगलग्रस्त परिस्थिती थांबविण्यासाठी जिजाऊ रथयात्रा –प्रा. अर्जुन तनपुरे



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** मराठा सेवा संघाने महाराष्ट्रातच नव्हे जगभरात जिजाऊ, शिव, शाहु, फुले, आंबेडकर विचार जनमाणसात रूजविण्याचे काम केले आहे. प्रबोधनाच्या माध्यमातून अनेक लेखक, वक्ते,शाहीर, किर्तनकार निर्माण केले. मराठा बहुजन समाजाला विविध विषयांवर सभा, कॉर्नर बैठकांच्या माध्यमातून चर्चा करण्यासाठी आपापसातील संवाद वाढविण्यासाठी ही रथयात्रा महत्वाची ठरत आहे, असे मनोगत मराठा सेवा संघाचे मार्गदर्शक प्रा. अर्जुन तनपुरे यांनी व्यक्त केले.

मराठा सेवा संघाच्या वतीने १८ मार्च ते १ मे दरम्यान महाराष्ट्रभर ‘मराठा जोडो अभियान’ हे ब्रीद घेऊन जिजाऊ रथयात्रा फिरणार आहे. रथयात्रेचे शनिवारी (दि.६) नांदेडमध्ये आगमन झाले. या रथयात्रेचे सिडकोत जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी मार्गदर्शक ते बोलत होते.

ते म्हणाले की, सोमवारी (दि.७) दुपारपर्यंत शहरासह जिल्ह्यातील अनेक तालुक्यात फिरणार आहे. शहाजी महाराज जयंती दिवशी (दि.१८) भोसले गढी वेरूळ जिजाऊ यात्रेला प्रारंभ झाला. कामगार दिन व महाराष्ट्र दिनी (१ मे) पुणे येथील लालमहल येथे यात्रेचा समारोप होणार आहे. या सोहळ्याला सर्वांनी उपस्थित राहावे, असेही आवाहन प्रा.तनपुरे यांनी केले.

जिजाऊ रथयात्रेचे सिडकोमध्ये रविवारी आगमन होताच प्रारंभी विरशिरोमणी महाराणा प्रताप, माता रमाई आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा सिडको, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुतळा, राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब, महात्मा बसवेश्वर यांना प्रा. अर्जुन तनपुरे यांनी अभिवादन केले.

यावेळी मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार म्हणाले की, राठा सेवा संघाच्या चळवळीत सिडको नेहमी अग्रेसर राहिलेला आहे. बहुजन बांधव सिडको हडको परिसरात एकत्रितपणे कार्य करतात ही फार मोठी जमेची बाजु आहे.

प्रारंभी सुबोध पाटील यांनी सामुहिक जिजाऊ वंदना घेतली.संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील यांनी प्रास्ताविक केले. तर उत्तम जाधव यांनी आभार मानले.

हरियाणा मराठा सेवा संघाचे मांदीराम चोपडा, संभाजी ब्रिगेडचे प्रदेश कार्याध्यक्ष डॉ. गजानन पारधी, संभाजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक उमाकांतउफाडे, इंजि. शे. रा. पाटील, इंजि. व्ही.टी. शिंदे, इंजि. शिवाजीराजे पाटील, सोपानराव क्षिरसागर, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष पि. के. कदम, जिल्हाध्यक्ष सतीश जाधव, जिजाऊ ब्रिगेडच्या विभागीय कार्याध्यक्षा डॉ. विद्या पाटील, जिल्हाध्यक्ष सुमित्रा वडजकर, जिल्हाध्यक्ष कल्पना चव्हाण, मिनाक्षी पाटील, माजी नगरसेविका डॉ.करुणा जमदाडे, बालाजी गाडे, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे आदिंची यावेळी उपस्थिती होती.

कार्यक्रमासाठी मराठा सेवा संघाचे सिडको अध्यक्ष दिलीप कदम, भगवान ताटे, साहेबराव गाढे, जयवंत काळे, त्र्यंबक कदम,दिपक भरकड, एकनाथ पाटील, प्रमोद टेकाळे, उद्धव ढगे, बि. एम. हिवराळे, सुभाष सुर्यवंशी, अनिल हुंबाड, विकास पाटील, संभाजी मस्के, आत्माराम शिंदे, रोहिदास कवाळे, जिजाऊ ब्रिगेड सिडको अध्यक्षा अनुराधा पाटील, कमल हिवराळे, रूक्मिणी सुर्यवंशी, प्रेमला सुयर्वंशी, वंदना मस्के, संगिता कदम, सविता गाढे यांसह अनेकांनी परिश्रम घेतले.

# वाळूची अवैध वाहतूक करणारे तीन हायवा जप्त; सोनखेड पोलिसांची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** सोनखेड (ता. लोहा) पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाळूची अवैधरित्या वाहतूक करणारे तीन हायवा जप्त करण्यात आले. तिन्ही चालकाविरुद्ध सोनखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोनखेड ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार ठाण्याच्या हद्दीतून अवैध वाळू उपसा व वाहतूकीला आळा बसावा यासाठी गस्त सुरू केली. यावेळी अवैध वाळू वाहतूक करणारे हायवा (एमएच १२ एस एफ ३१ ६५), (एमएच०१ सीआर ८७ ७४), ( एमएच ३८ एक्स ००७७) तीन वाहने जप्त केले. यावेळी संजू मधुकर किरतवार पाताळगंगा ता. कंधार, रोहिदास संजय चव्हाण (वय ३५) दुर्गा तांडा ता. कंधार आणि भागवत गोविंदराव कराडे (वय ३५) रा. पारवा ता. पालम या तिघांविरुद्ध सोनखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. ७५ हजारांची अवैध वाळू व तीन हायवा असा ९५ लाख ७५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# शॉर्ट सर्किटने गोठा जळून खाक, बैलजोडीचा मृत्यू

## दाभड येथील शेतकऱ्याचे लाखों रुपयांचे नुकसान

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील दाभड शिवारातील गोठ्याला रविवारी दुपारी आग लागून बैलजोडी आणि वैरण शेती साहित्ये जाळून खाक झाले आहे. या घटनेत शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

शिवाजी माधवराव टेकाळे यांच्या दाभड शिवारात रविवारी दुपारी महावितरणच्या थ्री फेज लाईनच्या तारा एकमेकांना स्पर्श होऊन शॉर्ट सर्किट झाले व आखाड्याला आग लागली. कडब्यासह आखाड्याने पेट घेतला. त्यात बैलजोडीचा होरपळून



मृत्यू झाला. अन्य काही जणावरे भाजली आहेत तर जनावरांचा चारा, कडबाकुट्टी यंत्र, शेती उपयोगी साहित्य जळुन खाक झाले.

यावेळी अग्निशामक दलाचे रवी भोपळे, साहाय्यक पशुधन वि.अधिकारी रवी सुरेवाड, डी.बी. गायकवाड यांनी धाव घेतली. तर मंडळ अधिकारी महेश वाकडे, तलाठी रवी पल्लेवाड, जमादार माधव पाटील आदींनी घटनास्थळाचा पंचनामा केला आहे.

यात शिवाजीराव टेकाळे यांचे सहा लाख चाळीस हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. नुकसान ग्रस्त शेतकऱ्यास महावितरण कडून आर्थिक मदत करावी अशी मागणी शेतकरी वर्गातुन होत आहे.

# नायगाव तालुक्यात रामनवमी उत्साहात साजरी



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)–** भजन, कीर्तन, महाप्रसाद, राम जन्मसोहळा आणि ‘जय श्री रामा’च्या जयघोषात रामनवमी नायगाव तालुक्यात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. लहान मुलांपासून ते पुरुष, महिलांनी राम मंदिर व विठ्ठल मंदिरामधे दर्शनासाठी गर्दी केली होती.

तालुक्यातील नरसी येथे राम मंदिरामध्ये व विठ्ठल रखुमाई मंदिरात श्री राम नवमी निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी भजन व कीर्तन व दुपारी १२ :३५ वाजता रामजन्म सोहळा पार पडला. सोहळ्यानंतर भाविकांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला. राम व विठ्ठल रखुमाई, साईबाबांच्या दर्शनासाठी नायगाव तालुक्यातील भावीकांनी मोठी गर्दी केली होती.

# नांदेड पतंजलीतर्फे श्रीरामनवमी साजरी

**नांदेड (प्रतिनिधी)–** पतंजली योग परिवाराच्यावतीने श्रीरामनवमी साजरी करण्यात आली. तसेच स्टेडियम रोडवरील रजिस्ट्री ऑफीसशेजारी चंदगिराम सन्स येथे पूज्य स्वामी रामदेवजी महाराज यांचा सन्यास दीक्षा दिवस साजरा करण्यात आला.

पतंजली योग समिती, भारत स्वाभिमान, महिला पतंजलि योग समिती, युवा भारत, पतंजलि किसान सेवा समिती, सोशल मीडियाच्यावतीने सकाळी ५.३० निःशुल्क योग शिबिर घेण्यात आले. मुलांसाठी सेल्फ डिफेंस कार्यक्रम, संकल्प



यज्ञ, मान्यवरांचे मार्गदर्शन असे कार्यक्रम घेण्यात आले.

यावेळी सर्वश्री गोवर्धन अग्रवाल, पंढरीनाथ कंठेवाड, राजसाहेब साजने, शिवाजीराव शिंदे, सतीश मुक्कावार, बापूराम मोरे, गिरीश भंडारी, अलोक अग्रवाल, नंदसिंह तवर, शंकर तुपकरी, हरिहर नरवाडे, गजानन केरुरे, पुष्पा केरुरे, श्रीराम मोर, प्रत्यूष केरुरे, श्रावणी केरुरे, राजेंद्र शंकरपुर, वसंतराव कल्याणकर, महारुद्र माळगे, देवेश सलगरकर, अनिल कामिनवार, प्रदीप तेललवार, प्रसाद तेललवार, विकास बंनगिनर, हुकुमसिंह गहलोत, महानंदा माळगे, सविता गबाळे, सरला तरोळे, तेजस्विनी साबळे, सुरेखा घोगरे, यशोदाबाई शिंदे, वेदांत कामिनवार, उषा धूंमनवार, निर्मल कोरे, नागभूषण सामलेटी, निर्मला सामलेटी, समीक्षा शिंदे, संदेश शिंदे, समर्थ शिंदे, अभिनव शिंदे आदि मान्यवर उपस्थित होते, असे अनिल अमृतवार यांनी सांगितले.

# रेणुकाबाई मुंगल यांचे निधन

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** खैरगाव येथील ज्येष्ठ महिला रेणुकाबाई राजाराम पा. मुंगल (वय ७५) यांचे रविवारी दि. ६ सायंकाळी अल्पशा आजाराने निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर सोमवार दि.७ रोजी दुपारी १ वाजता खैरगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात चार मुले, एक मुलगी, सुना, नातू, पणतू असा परिवार आहे. बाबुराव मुंगल, अशोक मुंगल, भगवान मुंगल, किशन मुंगल यांच्या त्या मातोश्री होत.

# कडुलिंब सलामृत प्राशन शिबिराला प्रतिसाद

**हदगाव (प्रतिनिधी)–** दिग्रस येथील आयुर्वेद अभ्यासक किशोर बनगिनवार यांच्या मार्गदर्शनाखाली कडुलिंब सालामृत व रस प्राशनाचे पाच दिवसीय शिबीराचा शनिवारी समारोप झाला. हदगाव आर्य वैश्य महिलामंडळाच्यावतीने एक एप्रिलपासून न्याय देवता दुर्गा महोत्सव आणि हनुमान मंदिर परिसरात चाललेल्या या शिबिराला मोठी प्रतिसाद मिळाला.



कडुलिंब सलामृत व रस प्राशन शिबिराचे जनक किशोर बनगीनवार व हिंगोली येथील सर्पमित्र व वृक्षमित्र, निवृत्त वनपाल टी.एम. सय्यद यांनी शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. लिंबाच्या अर्काचे सेवन मानवी जीवनासाठी किती उपकारक आहे, याविषयी तसेच मानवासाठी वृक्ष लागवड व संगोपन किती गरजेचे आहे, याचे महत्व विशद केले.

शरीरातील अनेक व्याधींवर गुणकारी असलेल्या कडुलिंबाच्या आंतरसालीच्या रसाचे प्राशन दिग्रस येथील कृषी व्यवसायिक ७५ वर्षीय किशोर बनगिनवार हे मागील ४० वर्षापासून करीत असून त्यांना त्यापासून फायदा म्हणजे ते निरोगी जीवन जगत आहेत. त्यांच्या या अनुभवाचा फायदा जास्तीत जास्त नागरिकांना व्हावा, या उद्देशाने ते मागील अकरा वर्षांपासून या शिबिराचे आयोजन करीत आहेत. कडुलिंबाच्या झाडाला आयुर्वेदात अत्यंत महत्त्व आहे. पाडव्यास नवीन मोहर आलेल्या कडुलिंबाचे औषधीयुक्त गुण अधिक परिणामकारक होत असल्याने संपूर्ण चैत्र महिन्यात अनेक नागरिक कडुलिंबाच्या अंतर सालीच्या रसाचे आणि पाल्याच्या रसाचे सेवन करीत आहेत. हदगांव येथे तीन वर्षापासून होणारे हे शिबिर यावर्षी ०१ एप्रिल ते ०५ एप्रिल घेण्यात आले.

कडुलिंबाच्या अंतर सालीच्या रसाच्या मिश्रणाचा हा रस दररोज उपस्थित सर्व नागरिकांना सकाळी सात ते साडेसात दरम्यान न्याय देवता हनुमान मंदिराजवळ शिबीर स्थळी वितरित करण्यात आला.

शिबिराच्या समारोपप्रसंगी स्वतः किशोर बनगिनवर यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. या शिबिरासाठी हदगाव शहरातील आर्य-वैश्य समाजाचे सर्व व्यावसायिक बंधू भगिनी तसेच त्यांच्या संपर्कातील सर्व उच्चशिक्षित आणि व्यावसायिक मंडळींनी शिबिरादरम्यान दररोज हा रस प्राशन करून लाभ घेतला.

# सोशल मीडियावर दहशत पसरविणाऱ्या तीन युवकांवर सोनखेड पोलिसांची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** विविध कारनामे करीत, घातक शस्त्रे बाळगत समाजमाध्यमांवर दहशत पसरविणाऱ्या तीन युवकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच प्रतिबंधात्मक कारवाई करीत समाजमाध्यमांवरील त्या आक्षेपार्ह पोस्ट डिलीट केल्या आहे. ही कारवाई सोनखेड पोलिसांनी शनिवारी केली.

सोशल मिडीयावर तलवार, खंजीर, पिस्तुल इत्यादी आक्षेपार्ह पोस्ट टाकून काही गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक, गैंगस्टर, समाजकंटक हे सामान्य नागरिक व समाजामध्ये भिती पसरविण्याचे काम करत आहेत. वाहनांची रेसींग, स्टंटबाजी करून त्याचे व्हिडीओ समाज माध्यमावर व्हायरल करत आहेत. अशा लोकांची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सोशल मीडिया मॉनिटरिंग सेलची स्थापना केली आणि सायबर पोलीस स्टेशनला याबाबत कडक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या.

त्यानुसार सोशल मिडीया मॉनिटरिंग दरम्यान सायबर पोलीस स्टेशनने शनिवारी (दि.५) इन्स्टाग्राम अकाउंटची पूर्ण माहीती काढून ३ प्रकरणे सोनखेड पोलीस स्टेशनकडे रेफर केली. त्यावरून पोलीस स्टेशन सोनखेड येथे गुरनं. ७२/२०२५ कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करून कार्यवाही करण्यात आली व २ प्रकरणात कलम १६८ BNSS प्रमाणे कार्यवाही करण्यात आली. तसेच समाजामध्ये दहशत पसरविणारे व्हिडीओ तसेच आक्षेपार्ह पोस्ट डिलीट करण्यात आले आणि योग्य ती प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात येत आहे.

गुन्हेगारी प्रवृतीचे लोक, समाजकंटक, गँगस्टर, इतर जे कोणी इसम अशा प्रकारचे भितीदायक आक्षेपार्ह पोस्ट, व्हिडीओ समाज माध्यमांवर व्हायरल करणाऱ्यावर सोशल मिडीया मॉनिटरिंग सेलची करडी नजर असणार आहे. अशा प्रकारचे व्हिडीओ, पोस्ट आपल्या निर्दशनास आल्यास ७७७४०३४१०० या Whatsapp क्रमांकावर संपर्क करून आमचे निदर्शनास आणून दयावे.त्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल.

ही कामगिरी पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक धिरज चव्हाण, सोनखेड ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक पांडूरंग माने, सहायक पोलीस उपनिरीक्षक गणपत गिते, पोलीस हेड कॉन्स्टेबल ज्ञानोबा कवठेकर व सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक मारोती चव्हाण यांनी पार पाडली.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com